दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर| पुणे| छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिद्ध

## संगमनेरमध्ये अल्पवयीन मुलीवर अत्याचार; आरोपींवर पोक्सोसह गुन्हे दाखल

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खांडगाव शिवारात एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर जबरदस्तीने अत्याचार केल्याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलीच्या ३३ वर्षीय आईने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी ही कारवाई केली आहे. तालुक्यातील खांडगाव शिवाराती आरोपी गणेश चंद्रभान गायकवाड याने अल्पवयीन मुलीवर अत्याचार आणि जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) आणि पोक्सो अंतर्गत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना बुधवारी १५ जुलै रोजी पहाटे तीन ते चार वाजेच्या सुमारास खांडगाव शिवारात घडली. आरोपी गणेश चंद्रभान गायकवाड याने पीडित मुलगी अल्पवयीन असल्याचा गैरफायदा घेतला. त्याने पीडितेला घरातून बाहेर बोलावून घेतले आणि **( उर्वरीत पान ४ वर)**

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.००। अंक २७२ । गुरुवार, दि.१६ जुलै २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

### महत्वाचे...

### देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन १७ जुलैला धावणार



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वेची पहिली हायड्रोजन ट्रेन हरियाणातील जिंद-सोनीपत विभागात धावणार आहे. ही ट्रेन १० डब्यांची हायड्रोजन फ्युएल सेल आधारित आहे. या ट्रेनला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून १७ जुलै रोजी हिरवा झेंडा दाखवला जाणार आहे. या ट्रेनचा कमाल ताशी वेग ७५ किमी इतका असेल. या ट्रेनच्या माध्यमातून भारतीय रेल्वे हरित आणि शाश्वत वाहतुकीच्या दृष्टीनं महत्त्वाचं पाऊल टाकणार आहे.

# ४८ हजार कोटींची वीजबिल माफी

## शेतकऱ्यांची'पाटी कोरी'करणार:फडणवीस

- ४८ हजार कोटींची कृषी वीजबिल थकबाकी माफ
- साडेसात हॉर्स पॉवरपर्यंतच्या कृषी वीजजोडण्यांना दिलासा
- वर्षाअखेर १००% शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज देण्याचे लक्ष्य
- कर्जमाफी अंतिम उपाय नाही; आधुनिक तंत्रज्ञानावर भर
- ५० हजार शेतकरी गट उभारून शेतीत गुंतवणूक वाढविणार
- नैसर्गिक शेती, ठिबक सिंचन आणि देशी गाईंच्या संवर्धनावर सरकारचा भर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी आणखी एक मोठी घोषणा करत साडेसात हॉर्स पॉवरपर्यंतच्या कृषी वीजजोडण्यांवरील ४८ हजार कोटी रुपयांची जुनी थकबाकी माफ करण्याचा निर्णय जाहीर केला. या निर्णयामुळे लाखो शेतकऱ्यांची जुनी थकबाकी शून्यावर येणार असून त्यांना नव्याने वीजजोडणी व इतर सुविधा मिळण्यातील अडथळे दूर होणार आहेत.मुंबईतील एका कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, सध्या साडेसात हॉर्स पॉवरपर्यंतच्या कृषी पंपांना मोफत वीज दिली जात आहे. मात्र, पूर्वीची थकबाकी प्रत्येक शेतकऱ्याच्या खात्यावर कायम असल्याने नवीन वीजजोडणीसह अनेक शासकीय प्रक्रियेत अडचणी निर्माण होत होत्या. त्यामुळे शेतकऱ्यांची पाटी कोरी झाली पाहिजे आणि त्यांना नव्याने इतिहास लिहिता आला पाहिजे, या भूमिकेतून ४८ हजार कोटी रुपयांची थकबाकी माफ करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, राज्यातील ७६ टक्के शेतकऱ्यांना सध्या दिवसा मोफत वीज दिली जात असून यावर्षाअखेर हे प्रमाण १०० टक्क्यांवर नेण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक वाढविणे, उत्पादन खर्च कमी करणे आणि जागतिक बाजारपेठ लक्षात घेऊन आधुनिक शेतीला चालना देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.फडणवीस म्हणाले, कर्जमाफी हा शेवटचा उपाय नसून ती कायमस्वरूपी तोडगा ठरू शकत नाही. सात-आठ वर्षांनी कर्जमाफी करावी लागत असेल तर शेतीतील मूलभूत समस्या सोडविण्याची गरज आहे. कोणीही कर्जमाफीमुळे श्रीमंत झाला नाही. शेती फायद्याची करायची असेल तर नवीन तंत्रज्ञान, गुंतवणूक आणि उत्पादकता वाढविणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

२०१४ नंतर जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, ठिबक सिंचन आदी योजनांमुळे शेतीला मोठा आधार मिळाल्याचा दावा करत त्यांनी नैसर्गिक शेती, देशी गाईंचे संवर्धन, जमिनीची सुपीकता वाढविणे आणि शेतकरी उत्पादक गटांद्वारे गुंतवणूक वाढविण्यावर सरकारचा भर असल्याचे स्पष्ट केले. पुढील दोन ते तीन वर्षांत ५० हजार शेतकरी गट उभारण्याचे उद्दिष्टही त्यांनी जाहीर केले. **( उर्वरीत पान ४ वर)**

# 'बेग टोळी'वर मोक्का लावण्याच्या मागणीसाठी सर्वपक्षीय महामोर्चा

## श्रीरामपूरचा 'बाप' होण्याचा प्रयत्नही करू नका : आ. ओगले

## नकली उपरणेवाल्यांची दहशत अधिक : चित्ते

छाया - अमोल कदम




**चार पोलिसांची अवैध धंद्यात भागीदारी?**
आंदोलनादरम्यान पोलिसांच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप घेण्यात आले. स्थानिक गुन्हे शाखेतील काही पोलीस कर्मचारी थेट गुन्हेगारांच्या संपर्कात असल्याचा आरोप आमदारांनी केला. यात अमोल गायकवाड, सागर बनसोडे, सागर पडोळे, राहुल नरवडे या पोलिसांची बेग टोळीशी थेट भागीदारी असल्याचा दावा आमदार ओगले यांनी केला. या संशयित पोलिसांना केवळ निलंबित न करता सेवेतून थेट बडतर्फ करावे आणि तसा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

**सभेत ऐकवली ऑडिओ क्लिप!**
गुन्हेगारांची दहशत किती वाढली आहे हे सिद्ध करण्यासाठी सभेत एका गुन्हेगाराने गावाच्या सरपंचाला फोनवरून दिलेल्या धमकीची ऑडिओ क्लिप थेट माईकवर ऐकवण्यात आली. हिंदू गुंडांकडून सामान्य नागरिकांना कशा प्रकारे छळले जात आहे, याचे जिवंत उदाहरण या क्लिपद्वारे समोर आणण्यात आले.

**शेखर दुबैय्या यांची हाक...**
मुरकुटे, लोखडे, चित्ते, काबळे, यांना उद्देशून मृत तरुण आकाश दुबैय्या यांचे वडील शेखर दुबैय्या यांनी 'तुम्ही अशा( बेग टोळीचे नाव घेता) गुंडांना पक्षात कश्यासाठी ठेवतात, तुम्ही राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सांगून गुन्हेगारांना पक्षात ठेवू नका, नाहीतर हे गुन्हेगारी पार्श्वभूमीचे लोक तुमचा घात करतील', अशी मागणी केली.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहरातील तरुण हॉटेल व्यावसायिक आकाश शेखर दुबैय्या यांच्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ श्रीरामपूरकरांच्या संतापाचा उद्रेक झाला आहे. गुन्हेगारी टोळ्यांचा बिमोड करण्यासाठी आणि सराईत गुन्हेगारांवर 'मोक्का' अंतर्गत कारवाई करण्याच्या प्रमुख मागणीसाठी बुधवारी श्रीरामपूर पोलीस ठाण्यावर ऐतिहासिक व भव्य सर्वपक्षीय महामोर्चा काढण्यात आला. दरम्यान, हत्येच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या 'श्रीरामपूर बंद'ला सलग तिसऱ्या दिवशीही व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शहराच्या इतिहासात गुन्हेगारीविरुद्ध सलग चार दिवस स्वयंस्फूर्तीने कडकडीत बंद पाळण्याची ही पहिलीच वेळ असून, यातून नागरिकांमधील प्रचंड असंतोष आणि सुरक्षेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे.बुधवारी सकाळी शहरातील ऐतिहासिक श्री हनुमान मंदिरापासून या विराट मोर्चाची सुरुवात झाली आणि छत्रपती शिवाजी स्मारकापर्यंत मोर्चात हजारो श्रीरामपूरकर, सर्वपक्षीय नेते, व्यापारी, सामाजिक संघटना आणि विविध क्षेत्रांतील नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते. या आंदोलनात राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वपक्षीय नेते एकत्र आले होते. यामध्ये माजी आमदार भानुदास मुरकुटे, लहू कानडे, भाऊसाहेब कांबळे, नगराध्यक्ष करण ससाणे, प्रकाश चित्ते, दीपक पटारे, अशोक थोरे, संजय छल्लारे, श्रीनिवास बिहाणी, वैशाली चव्हाण, रमाबाई धिवर, बाबासाहेब दिघे, नानासाहेब पवार, बाबासाहेब चिडे,यांसह विविध गावांतील सरपंच, उपसरपंच, नगरसेवक आणि हजारो श्रीरामपूरकर नागरिक उपस्थित होते. मोर्चाला संबोधित करताना आमदार हेमंत ओगले यांनी **( उर्वरीत पान ४ वर)**

## ऑपरेशन तुतारीला तुर्तास ब्रेक

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** ठाकरेंच्या शिवसेनेचे सहा खासदार फुटल्यानंतर आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीचेही खासदार फुटतील अशी चर्चा सुरू असताना मोठी अपडेट समोर आली आहे. राष्ट्रवादीच्या खासदारांमध्ये फूट पडणार नाही, ऑपरेशन तुतारीला सध्या ब्रेक लागल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे खासदार फुटतील अशी चर्चा होती. आता मात्र या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. शरद पवारांच्या पक्षाचे खासदार फुटणार नाहीत, शिवसेनेला त्यांचे खासदार फोडण्यात काही रस नाही, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

## कुख्यात सोनू बेगला दुसऱ्या गुन्ह्यात अटक

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर :** श्रीरामपूर परिसरातील संघटित गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी श्रीरामपूर शहर पोलिसांनी धडक कारवाई सुरूच ठेवली आहे. याच मोहिमेअंतर्गत, रेकॉर्डवरील कुख्यात गुन्हेगार सोनू उर्फ जयप्रकाश अशोक बेग (रा. सरस्वती कॉलनी, वॉर्ड नंबर ७, श्रीरामपूर) याला पोलिसांनी दुसऱ्या एका गंभीर गुन्ह्यात वर्ग करून अटक केली आहे. न्यायालयाने आरोपीला १६ जुलै पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर क्रमांक ६९१/२०२६ मधील भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ च्या कलम ३, ७, २५ नुसार सोनू बेग याच्यावर गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्याच्या तपासासाठी श्रीरामपूर पोलिसांनी कंबर कसली होती.आरोपी सोनू बेग हा आधीच अन्य एका गुन्ह्यात अहिल्यानगर येथील मध्यवर्ती कारागृहात होता. श्रीरामपूर पोलिसांनी अत्यंत कायदेशीर व चोख नियोजन करून न्यायालयाकडून त्याचे 'प्रोडक्शन वॉरंट' मिळवले. त्यानुसार अहिल्यानगर कारागृहातून अत्यंत कडक पोलीस बंदोबस्तात त्याला श्रीरामपूर न्यायालयात हजर करण्यात आले. सरकारी पक्षाचा युक्तिवाद आणि गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. न्यायालयाने आरोपी सोनू बेग याला (दि. १६) जुलै पर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

सदरची धडक कारवाई अहमदनगरचे जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, व श्रीरामपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर, यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.या कारवाईमुळे श्रीरामपूर परिसरातील गुन्हेगारी जगतात मोठी खळबळ उडाली असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस कटीबद्ध असल्याचा संदेश नागरिकांमध्ये गेला आहे.या प्रकरणाचा पुढील सखोल तपास श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विशाल चंद्रकांत खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हर्षवर्धन बहिर हे करत आहेत. या तपासात आणखी काही धक्कादायक माहिती आणि बेकायदेशीर शस्त्रास्त्रांचे धागेदोरे हाती लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# १३ रेखांकन मंजुरी प्रकरणांत अनियमितता

## मनपा आयुक्तांची लेखी कबुली; दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत सन २०२० नंतर ०.४० हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या भूखंडांना देण्यात आलेल्या १३ तात्पुरत्या व अंतिम रेखांकन मंजुरी प्रकरणांमध्ये गंभीर अनियमितता झाल्याची बाब महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी शासनाला पाठविलेल्या पत्रातून मान्य केल्याचा दावा सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांनी केला आहे. त्यामुळे संबंधित मंजुऱ्या तत्काळ रद्द करून दोषी अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी नगर विकास विभागाच्या अपर मुख्य सचिवांकडे केली आहे.

शेख यांनी दिलेल्या निवेदनानुसार, नगर विकास विभागाच्या २९ नोव्हेंबर २०२२ च्या स्पष्टीकरणात्मक आदेशानुसार ३ डिसेंबर २०२० नंतर निर्माण झालेल्या ०.४० हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या भूखंडांसाठी एकूण क्षेत्राच्या किमान १० टक्के किंवा किमान २०० चौरस मीटर खुली जागा राखीव ठेवणे बंधनकारक आहे. मात्र या अटीचे पालन न करता तत्कालीन सहाय्यक संचालक नगररचना राम चारठाणकर यांनी तात्पुरत्या मंजुऱ्या दिल्या. त्यानंतर तत्कालीन आयुक्त पंकज जावळे, विद्यमान आयुक्त यशवंत डांगे आणि नगररचनाकार वैभव जोशी यांनी आवश्यक कायदेशीर पडताळणी न करता अंतिम मंजुऱ्या दिल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

या प्रकरणाची तक्रार १ डिसेंबर २०२५ रोजी शासनाकडे करण्यात आली होती. त्यानंतर संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य यांनी ८ मे २०२६ रोजी सहसंचालक नगररचना, नाशिक आकाश बागुल यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली. मात्र चौकशी सुरू असतानाच समितीचे अध्यक्ष आकाश बागुल यांनी १९ जून २०२६ रोजी संबंधित १३ प्रकरणांना अनुकूल अभिप्राय दिल्याने चौकशीच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचा आरोप शेख यांनी केला आहे.याच पार्श्वभूमीवर ७ जुलै २०२६ रोजी शेख यांनी आकाश बागुल यांच्या कार्यपद्धतीबाबत शासनाकडे स्वतंत्र तक्रार दाखल केली. त्याच दिवशी आयुक्त यशवंत डांगे यांनी शासनाला पाठविलेल्या पत्रात संबंधित १३ रेखांकन मंजुरी प्रकरणांमध्ये अनियमितता झाल्याचे नमूद करत पुढील कार्यवाहीबाबत मार्गदर्शन मागितल्याचे शेख यांनी म्हटले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून योग्य निर्णय घेण्याची मागणी त्यांनी केली आहे.दरम्यान, आयुक्तांनी शासनाला पाठविलेल्या पत्रात मंजुरी रद्द झाल्यास विकासकांनी भरलेली प्रीमियम रक्कम परत करावी लागेल आणि महानगरपालिकेची आर्थिक स्थिती त्यासाठी सक्षम नसल्याने शासनाने मार्गदर्शन करावे, अशी विनंती केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.यावर आक्षेप घेत शेख यांनी बेकायदेशीर मंजुऱ्या कायम ठेवण्यासाठी आर्थिक अडचणीचे कारण ग्राह्य धरता येणार नाही, असे स्पष्ट केले आहे. विकास शुल्क व प्रीमियममधून जमा झालेल्या निधीच्या वापराची स्वतंत्र लेखापरीक्षण चौकशी करून शासनाला सादर करण्यात आलेल्या आर्थिक


**( उर्वरीत पान ४ वर)**

# कर्जतचे उपनगराध्यक्ष संतोष मेहेत्रेंवर अविश्वास!

## ठरावाच्या बाजूने ११ -० मतदान : ६ नगरसेवक विशेष सभेस गैरहजर; अंतिम निर्णय जिल्हाधिकाऱ्यांच्या कोर्टात!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** कर्जत नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष संतोष मेहेत्रे यांच्या अविश्वास ठरावाच्या बाजूने १७ पैकी ११ नगरसेवकांनी मतदान केले. तर ६ नगरसेवक या मतदान प्रक्रियेत अनुपस्थित राहिले. अविश्वास ठरावाच्या इतिवृंतात ११-० असा शेरा देत मुख्याधिकाऱ्यांनी तो अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविला. बुधवारी कर्जत नगरपंचायतीचे मुख्याधिकारी अक्षय जायभाये यांनी संतोष मेहेत्रे यांच्या अविश्वास ठरावावर विशेष सभा बोलावली होती. या बैठकीस ११ नगरसेवक उपस्थित होते. तर ६ नगरसेवकांनी सदरच्या बैठकीस दांडी मारली. विशेष म्हणजे गैरहजर नगरसेवकांमध्ये २ भाजपाच्या नगरसेवकांचा समावेश आहे.



कर्जत नगरपंचायतीमध्ये मागील अडीच महिन्यापासून नाट्यमय घडामोडी सुरू आहे. शुक्रवारी नूतन नगराध्यक्षा म्हणून छाया शेलार यांची अधिकृत घोषणा झाली. या निवडीचा जल्लोष विधान परिषदेचे सभापती राम शिंदे समर्थकांसह आमदार रोहित पवार समर्थकांनी देखील केला. नगराध्यक्षा निवडीनंतर १३ नगरसेवकांनी तात्काळ विद्यमान उपनगराध्यक्ष संतोष मेहेत्रे यांच्यावर अविश्वास प्रस्ताव मुख्याधिकारी अक्षय जायभाये यांच्याकडे दाखल केला. त्या अनुषंगाने मुख्याधिकारी जायभाये यांनी बुधवार, दि १५ रोजी दाखल उपनगराध्यक्ष प्रस्तावावर सकाळी ११ वाजता कर्जत नगरपंचायतीच्या सभागृहात सर्व १७ नगरसेवकांची विशेष सभा बोलावली होती. यापैकी ११ च नगरसेवक बैठकीस हजर होते. तर घुले समर्थक ४ आणि भाजपाच्या गटातून नॉट-रीचेबल झालेले २ नगरसेवक अनुपस्थित होते. सदरच्या बैठकीस पीठासीन अधिकारी म्हणून नगराध्यक्षा छाया शेलार यांनी काम पाहिले. या विशेष सभेत संतोष मेहेत्रे यांच्या अविश्वास ठरावाच्या **( उर्वरीत पान ४ वर)**

**ठराव पास की नापास?**
उपनगराध्यक्ष पदाच्या अविश्वास ठराव प्रकियेत काय घडले ? त्यांच्या विरोधात ठराव मंजूर झाला किंवा नाही ? याबाबत स्थानिक पत्रकारांनी कर्जतचे मुख्याधिकारी अक्षय जायभाये यांच्याकडून अधिकृत माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी सदर बैठकीचा अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविला असून पुढील निर्णय जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया घेणार असल्याची माहिती दिली. त्यामुळे मेहेत्रे यांना पदावरून दूर केले की ? ६ नगरसेवक उपस्थित नसल्याने तो प्रस्ताव बारगळला याबाबत संध्याकाळपर्यंत संभ्रम कायम होता.

**६ नगरसेवक गैरहजर**
बुधवारी संतोष मेहेत्रे यांच्या उपनगराध्यक्ष पदावरील अविश्वास ठरावास नगराध्यक्षा छाया शेलार, नगरसेवक नामदेव राऊत, अमृत काळदाते, गटनेते सतीश पाटील, नगरसेविका ज्योती शेळके, उषा राऊत, लंकाबाई खरात, प्रतिभा भैलुमे, सुवर्णा सुपेकर, अश्विनी दळवी आणि मोहिनी पिसाळ या उपस्थित होत्या. तर घुले समर्थक माजी नगराध्यक्षा रोहिणी घुले, भास्कर भैलुमे, भाऊसाहेब तोरडमल, संतोष मेहेत्रे यांच्यासह भाजपाच्या मोनाली तोटे आणि ताराबाई कुलथे अनुपस्थित राहिले. व्हीप नाकारल्याने गैरहजर नगरसेवकांवर अपात्रतेची टांगती तलवार उभी राहिली आहे.

# बहिऱ्या सत्तेचे कान टोचले..!




लोकशाहीत सरकारची ताकद विरोधकांना गप्प करण्यात नसते; तर विरोधाचा आवाज ऐकण्याच्या संवेदनशीलतेत असते. एखादा नागरिक, तोही देशासाठी आयुष्य वेचणारा शिक्षणतज्ज्ञ, वैज्ञानिक आणि रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेता सोनम वांगचुक तब्बल अठरा दिवस अन्नत्याग करून जंतर-मंतरवर बसलेला असतो, त्याचे आठ किलोहून अधिक वजन घटते, प्रकृती खालावते, देशभरातून चिंता व्यक्त होते, न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागतो; पण केंद्र सरकारकडून एक साधी अधिकृत चर्चा किंवा संवादाची तयारीही दिसत नाही. ही केवळ प्रशासकीय उदासीनता नाही, तर लोकशाहीतील संवेदनशीलतेच्या मृत्यूची धोकादायक घंटा आहे.

सोनम वांगचुक हे कोणतेही हंगामी आंदोलनकर्ते नाहीत. लडाखमध्ये शिक्षण, पर्यावरण आणि शाश्वत विकासासाठी त्यांनी केलेले कार्य जगभरात गौरवले गेले आहे. थ्री इडियट्स चित्रपटामुळे त्यांची ओळख घराघरात पोहोचली, पण त्यापूर्वीच त्यांनी शिक्षण क्षेत्रात प्रयोगशील काम करून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. अशा व्यक्तीला स्वतःचा जीव धोक्यात घालून उपोषण करावे लागते, हीच शासन व्यवस्थेची मोठी शोकांतिका आहे.

सरकारला प्रत्येक मागणी मान्य करावीच लागते, असे नाही. लोकशाहीत मतभेद असतात, विचारांचे संघर्ष असतात. परंतु संवाद नाकारणे, आंदोलनकर्त्यांकडे पूर्ण दुर्लक्ष करणे आणि परिस्थिती इतकी टोकाला जाऊ देणे की न्यायालयाला सरकारला नोटीस बजावावी लागावी, हे कोणत्याही सुसंस्कृत लोकशाहीला शोभणारे नाही.

गेल्या काही वर्षांत सरकारची एक नवी कार्यपद्धती दिसून येते. एखादा प्रश्न उपस्थित झाला की सुरुवातीला त्याकडे दुर्लक्ष करायचे. आंदोलन वाढले तर आंदोलनकर्त्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करायचे. त्यातूनही प्रश्न सुटला नाही तर वेळ मारून न्यायची. अखेरीस न्यायालयाने हस्तक्षेप केल्यानंतरच प्रशासन जागे झाल्याचे चित्र उभे करायचे. ही लोकशाही नव्हे; तर लोकशाहीतील संवाद प्रक्रियेचे अवमूल्यन आहे.

देशात नीट परीक्षेच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले. लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित मुद्द्यावर चर्चा व्हावी, जबाबदारी निश्चित व्हावी, अशी मागणी करण्यात येत आहे. त्या मागण्यांशी सहमत किंवा असहमत राहणे वेगळा विषय असू शकतो. मात्र, त्या मागण्या मांडणाऱ्या व्यक्तीच्या जीवाची किंमत सरकारसाठी शून्य असावी का? हा अधिक गंभीर प्रश्न आहे.

याचिकाकर्त्याने न्यायालयात एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. शांततापूर्ण आंदोलन हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे. त्याचबरोबर नागरिकाचा जीव वाचवणे ही सरकारची घटनात्मक जबाबदारी आहे. सरकारला उपोषण मान्य नसले तरी संवाद सुरू करणे, वैद्यकीय मदत देणे, परिस्थिती नियंत्रणात ठेवणे आणि तोडगा शोधण्याचा प्रयत्न करणे हे त्याचे कर्तव्य आहे. परंतु येथे दिसते ते पूर्ण मौन.

विशेष म्हणजे, विरोधी पक्षांचे नेते, विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि अनेक नागरिक वांगचुक यांना उपोषण मागे घेण्याची विनंती करत आहेत. उद्धव ठाकरे यांनीही त्यांच्या प्रकृतीची चिंता व्यक्त केली. समाजातील विविध स्तरांतून संवादाची अपेक्षा व्यक्त होत आहे. पण ज्यांच्याकडे निर्णयक्षमता आहे, त्या सत्ताधाऱ्यांकडून मात्र शांतता आहे. ही शांतता संवेदनशीलतेची नसून असंवेदनशीलतेची आहे.

सरकार अनेकदा ''सबका साथ, सबका विकास'' किंवा ''लोकशाही ही संवादाची प्रक्रिया आहे'' असे सांगते. मग त्या संवादाचे दरवाजे आंदोलनकर्त्यांसाठी बंद का होतात? निवडणूक प्रचारात जनतेच्या दारात जाणारे सत्ताधारी आंदोलनकर्त्यांच्या तंबूपर्यंत का पोहोचत नाहीत? एका फोन कॉलने किंवा चर्चेच्या निमंत्रणानेही अनेकदा तणाव निवळू शकतो. परंतु अहंकार संवादावर मात करू लागला की लोकशाहीची गुणवत्ता खालावते. न्यायालयाने केंद्र आणि दिल्ली सरकारला उत्तर मागितले, ही बाब स्वतःमध्येच गंभीर आहे. कारण याचा अर्थ असा की प्रशासनाने आपली प्राथमिक जबाबदारी पार पाडली नाही. लोकशाहीत न्यायालय हे शेवटचे व्यासपीठ असते; पहिले नव्हे. सरकारने स्वतःहून पुढाकार घेऊन संवाद साधायला हवा होता. न्यायालयाने सांगितल्यावरच जागे होणारी व्यवस्था ही कार्यक्षम म्हणता येणार नाही. या प्रकरणाकडे केवळ एका आंदोलनाच्या चौकटीत पाहणे चुकीचे ठरेल. हा प्रश्न लोकशाहीच्या आरोग्याचा आहे. सरकार जर टीका करणाऱ्यांकडे, प्रश्न विचारणाऱ्यांकडे किंवा उपोषण करणाऱ्यांकडे केवळ विरोधक म्हणून पाहू लागले, तर लोकशाहीचा आत्माच हरवतो. सत्तेचा उद्देश विरोध दडपणे नसून विरोध ऐकून त्यातून योग्य तो मार्ग शोधणे हा असतो. आज सोनम वांगचुक आहेत; उद्या दुसरा कोणी असेल. प्रश्न व्यक्तीचा नाही, तर सरकारच्या दृष्टिकोनाचा आहे. सरकारने संवादाऐवजी मौन, संवेदनशीलतेऐवजी उदासीनता आणि उत्तरदायित्वाऐवजी प्रतीक्षेचा मार्ग स्वीकारला, तर लोकशाहीतील विश्वासाचा पाया कमकुवत होईल. सोनम वांगचुक यांच्या सर्व मागण्या योग्य आहेत की नाहीत, याचा निर्णय चर्चेतून आणि लोकशाही प्रक्रियेतून होऊ शकतो. परंतु त्यासाठी प्रथम त्यांचा जीव सुरक्षित राहणे आवश्यक आहे. एका नागरिकाला न्यायालयाच्या दारात जाऊन सरकारला ''कृपया या माणसाचा जीव वाचवा'' असे सांगावे लागणे, ही कोणत्याही लोकशाहीसाठी लाजिरवाणी बाब आहे. सरकारने आता तरी मौन सोडावे. आंदोलनकर्त्यांशी संवाद साधावा. त्यांच्या प्रकृतीची तातडीने काळजी घ्यावी आणि प्रश्न सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावेत. कारण लोकशाहीची खरी ओळख विरोधकांना हरवण्यात नसते; तर विरोधाचा आवाज ऐकून त्याला उत्तर देण्यात असते. सरकार जर हे विसरले, तर इतिहास त्याच्या निर्णयांची नव्हे, तर त्याच्या असंवेदनशील मौनाची नोंद घेईल.

# रौप्य महोत्सवी वर्षा निमित्ताने श्री स्वामी अखंडानंद महाराज दिंडीस रथ भेट



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील टाकळीमिया येथून दरवर्षी श्रीक्षेत्र पंढरपूरला जाणाऱ्या श्री स्वामी अखंडानंद महाराज पायी दिंडी सोहळ्याच्या रौप्यमहोत्सवी वर्ष निमित्ताने कै.हिराबाई कारभारी शिंदे यांच्या स्मरणार्थ भैरवनाथ उद्योग समूहाचे चेअरमन बापूसाहेब शिंदे व शिंदे कुटुंबीयांच्या वतीने दिंडीस पाच लाख रुपये किमतीचा रथ भेट देण्यात आला.

यावेळी रथ लोकार्पण कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. सामाजिक व धार्मिक कार्यात नेहमी अग्रेसर असलेले बापूसाहेब शिंदे व कुटूंबियांनी रथ भेट देत दिंडीच्या सेवाकार्यात मोलाचे योगदान दिले असल्याची भावना वारकऱ्यांनी व्यक्त केली.

रयावेळी भैरवनाथ उद्योग समूहाचे संचालक पियुष शिंदे व नीलम शिंदे या उभयतांच्या हस्ते रथाचे विधिवत पूजन करण्यात आले. पौरोहित्य विजय जोशी व दिनेश जोशी यांनी केले. यावेळी दिंडी समितीच्या वतीने बापूसाहेब शिंदे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मियासाहेब पतसंस्थेचे चेअरमन शामराव निमसे, शेतकरी सेनेचे रवींद्र मोरे, अनंत कदम, डॉ. संदीप मुसमाडे, दिंडी समितीचे अध्यक्ष भाऊसाहेब शिंदे, संपत जाधव, साहेबराव निमसे, अनिल टेकाळे, पृथ्वीराज उंद्रे, किशोर मोरे, ज्ञानदेव निमसे, रमेश निमसे, भारत साळवे, सुरेश मोरे, भागवत नवाळे, गोरक्षनाथ मोरे, मच्छिंद्र गुंजाळ, बाबासाहेब चोथे, दत्तात्रय जाधव, दत्तात्रय आढाव, किरण शिंदे, राकेश शिंदे, संजय जाधव, रावसाहेब शिंदे, विष्णु शिंदे, अरुण शेळके, दत्तात्रय दानवे, जालिंदर करपे, सचिन हारदे, भागवत कोकाटे, संदीप शिंदे, बाळासाहेब कोळसे, विठ्ठल निमसे, शरद गायकवाड, किशोर चौधरी, रमेश मोरे, भारत पवार, शिवाजी माने, बाळासाहेब शिंदे, बंडू कोळसे, बाळासाहेब गल्हे, संदीप विधाटे, शरद धसाळ, आदिसह वारकरी ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी शिंदे कुटुंबियांच्या योगदानाबद्दल वारकऱ्यांनी समाधान व्यक्त करून आभार मानले.

# चारी दुरुस्तीचे काम पुन्हा सुरु

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** महाराष्ट्र राज्याचे जलसंपदामंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नामुळे गोदावरी उजव्या कालव्या अंतर्गत असलेल्या १९ ह्या चारीच्या दुरुस्तीकरणाचे काम पुन्हा सुरु करण्यात आले आहे. ना.विखे यांनी १२नोव्हेबर२०२५ रोजीवाकडी येथे आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात महाराष्ट्र जलसिंचन सुधारणा योजनेअंर्तगत गोदावरी उजवा तटकालव्याच्या वितरण व्यवस्थेच्या नूतनीकरणाच्या कामाचे भूमीपूजन केले होते त्यानुसार सर्व जुन्या चाऱ्यांचे नकाशाप्रमाणे खोलीकरण रुंदीकरण मजबूतीकरणाचे काम करण्यात येणार असल्याचे तसेच ह्या कामासाठी अंदाजे १५० कोटी रुपयाचा निधी मंजूर केल्याचे जाहिर केले होते.

त्यानुसार येथील १९ चारीच्या दुरुस्तीचे काम २८ मेपासून टेलपासून सुरु करण्यात आले होते. मध्यंतरी काही कारणामुळे ६ जून पासून बंद झाले होते. आता काम पुन्हा सुरु झाले आहे. सध्या चारीच्या दुरुस्तीसाठी चार फोकलँडमार्फत युध्दपातळीवर काम सुरु आहे अंदाजे १०० वर्षानंतर चाऱ्यांच्या दुरुस्तीचे काम होत असल्यामुळे ते चांगले व्हावे अशी अपेक्षा आहे.

# पाणीटंचाईविरोधात २० जुलैला 'भीक मागो' आंदोलन; पाणी हक्क संघर्ष समितीचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव ।** ग्रामीण भागातील तीव्र पाणीटंचाई, जलजीवन मिशनची रखडलेली कामे आणि प्रशासनाच्या आश्वासनपूर्तीतील दिरंगाईच्या निषेधार्थ पाणी हक्क संघर्ष समिती, राहुरीच्या वतीने २० जुलै रोजी 'भीक मागो आंदोलन' करण्यात येणार असल्याची माहिती समितीने दिली आहे. समितीने दिलेल्या माहितीनुसार, २२ जून रोजी राहुरी पंचायत समिती व तहसील कार्यालयावर काढण्यात आलेल्या मोर्चानंतर वावरथ, चिंचाळा, बुळे पठार, वरशिंदे, चिखलठाण, जांभळी आणि सात्रळ येथील पिण्याच्या पाण्याच्या समस्यांबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. जलजीवन मिशनअंतर्गत अनेक गावांतील कामे निधीअभावी बंद असल्याचे कारण प्रशासनाकडून दिले जात असून, गैरव्यवहार प्रकरणी काही अधिकाऱ्यांवर कारवाई होऊनही रखडलेल्या योजना सुरू झालेल्या नाहीत, असा आरोप समितीने केला आहे. याच पार्श्वभूमीवर, ग्रामीण भागातील पाणी योजनांसाठी सरकारकडे निधी नसल्यास तो जनतेकडून भीक मागून शासनाला पाठविण्याच्या प्रतीकात्मक भूमिकेतून हे आंदोलन करण्यात येणार आहे. आंदोलनाद्वारे रखडलेल्या पाणीपुरवठा योजनांना तातडीने निधी देणे, जलजीवन मिशनची कामे सुरू करणे, गैरव्यवहारातील दोषी ठेकेदारांवर कठोर कारवाई करणे आणि ग्रामीण भागात नियमित व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात येणार आहे. या आंदोलनात नागरिक, शेतकरी, महिला, युवक आणि सामाजिक संघटनांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पाणी हक्क संघर्ष समितीने केले आहे. निवेदन सादर करताना निखिल साळवे, देवराम जाधव, मधुकर विधाटे, श्रीराम विधाटे, रावसाहेब बर्डे, आदित्य साळवे, अक्षय बर्डे, डॉ. जालिंदर घिगे यांच्यासह समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# तंत्रज्ञानातील बदल स्वीकारून स्वतःला अद्ययावत करा : अमित कोल्हे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव ।** झपाट्याने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी काळानुरूप स्वतःमध्ये सातत्याने बदल घडवून आणत नवीन कौशल्ये आत्मसात करावीत. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) कितीही प्रगत झाली तरी तिचा योग्य वापर करण्यासाठी मानवी ज्ञान, विवेक आणि कौशल्याचीच आवश्यकता असते, असे प्रतिपादन संजीवनी युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष तथा संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे व्यवस्थापकीय विश्वस्त अमित कोल्हे यांनी केले.

संजीवनी ज्युनिअर कॉलेजच्या एमएचटी-सीईटी परीक्षेत ९० ते ९९.९९ पर्सेंटाइल मिळविणाऱ्या ३७ विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. संजीवनी ग्रुप ऑफ स्कूल्सच्या




व्यवस्थापकीय संचालिका डॉ. मनाली कोल्हे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

या परीक्षेत प्रथमेष रवींद्र गोसावी याने ९९.९९ पर्सेंटाइल मिळवत प्रथम क्रमांक, सिद्धेश प्रशांत क्षत्रिय याने ९९.२० पर्सेंटाइलसह द्वितीय, तर शौर्य संतोष थोरात याने ९६.०८ पर्सेंटाइल मिळवत तृतीय क्रमांक पटकावला.

डॉ. मनाली कोल्हे यांनी विद्यार्थ्यांच्या यशामागील पालक व शिक्षकांच्या योगदानाचा गौरव करत ज्ञान हीच आयुष्यभर साथ देणारी खरी संपत्ती असल्याचे सांगितले. यावेळी डॉ. राजन शेंडगे, डॉ. विपुल पटेल, प्रा. रेखा साळुंके यांच्यासह विद्यार्थी, पालक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तक्षशिलाचे विद्यार्थी रमले भक्ती रंगात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव :** येथील नामांकित तक्षशिला विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बालाजी दिंडी सोहळ्याचे भक्तीमय वातावरणात आणि उत्साहात स्वागत केले. विद्यालयात आज भक्तीचा एक अनोखा रंग पाहायला मिळाला. हभप सुखदेव महाराज मुंगसे यांच्या नेतृत्वाखाली श्री बालाजी दिंडी सोहळ्याचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले. या दिंडी सोहळ्याचे आगमन विद्यालयाच्या परिसरात होताच, संपूर्ण वातावरण विठ्ठल विठ्ठल नामाच्या जयघोषाने दुमदुमून गेले.

तक्षशिलाच्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक पोशाख परिधान करून या दिंडी सोहळ्याचे अत्यंत उत्साहात स्वागत केले. दिंडीचे स्वागत करण्यासाठी विद्यार्थी वारकऱ्यांच्या अंगावर पुष्पवृष्टी करून त्यांना प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. टाळ, मृदंग आणि मुखात मधुर आवाजातील अभंग यामुळे परिसराला पंढरपूरचे स्वरूप आले होते.

विद्यालयाचे शिक्षक प्रशासन आणि विद्यार्थ्यांनी मिळून दिंडीतील मुख्य पालखीचे व संतांचे पूजन केले. याप्रसंगी शिस्त आणि भक्तीचा सुरेख संगम पहावयास मिळाला. शेकडो विद्यार्थ्यांची उपस्थिती असूनही संपूर्ण सोहळा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आणि उत्साहात पार पडला. ''पुढील पिढीला आपल्या समृद्ध संस्कृतीची आणि परंपरांची ओळख व्हावी, याच उद्देशाने अशा उपक्रमांचे आयोजन केले जाते. आज विद्यार्थ्यांनी दाखवलेला उत्साह आणि भक्तीभाव कौतुकास्पद आहे,'' असे प्रतिपादन विद्यालयाचे प्राचार्य विठ्ठल कदम यांनी केले.

याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना आणि वारकऱ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. तक्षशिला विद्यालयातील या भक्तीमय सोहळ्याची चर्चा सध्या संपूर्ण परिसरात कौतुकासह होत आहे.



# शेतकऱ्यांनी कृषी विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचा लाभ घ्यावा : डॉ. प्रशांत बोडके

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी ।** महात्मा फुले कृषी विद्यापीठाने कृषी संशोधन क्षेत्रात देशपातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली असून, विद्यापीठाने विकसित केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा व सुधारित वाणांचा लाभ शेतकऱ्यांनी घेऊन उत्पादन वाढवावे, असे आवाहन विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी केले.

पाथर्डी तालुक्यातील मोहरी येथे राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत पौष्टिक तृणधान्य प्रकल्पाच्या माध्यमातून आयोजित 'खेत बचाव अभियान' व नागली बियाणे वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कृषी तंत्र शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता व वरिष्ठ ज्वारी पैदासकार डॉ. विजू अमोलिक, प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक डॉ. पंडित खर्डे, प्रा. अन्सार अत्तार, सरपंच पोपट नरोटे व सामाजिक कार्यकर्ते दगडू शेंडगे उपस्थित होते.

डॉ. बोडके यांनी नागली हे पौष्टिक व आरोग्यदायी पीक असून त्यापासून विविध मूल्यवर्धित पदार्थ तयार करता येतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते, असे सांगितले. तसेच एकात्मिक शेती पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी केले.

डॉ. विजू अमोलिक यांनी मोहरी परिसरात मृदसंधारणाची मोठी गरज असल्याचे सांगत विद्यापीठाने विकसित केलेल्या सुधारित वाणांचा वापर करण्याचे आवाहन केले. प्रास्ताविकात डॉ. पंडित खर्डे यांनी प्रकल्पाची माहिती दिली. कार्यक्रमात खेत बचाव अभियानाच्या माहितीपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले तसेच शेतकऱ्यांना नागलीच्या 'फुले कासारी' वाणाचे बियाणे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला परिसरातील शेतकरी व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# प्रवरासंगम येथे विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने दिंडीचे स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** विश्व हिंदू परिषद बजरंग दल सकल हिंदू समाज यांच्या वतीने आषाढी वारी पायी दिंडी सोहळा जाणाऱ्या सर्व दिंडी प्रवरासंगम-टोका-वाशिम या ठिकाणी असलेल्या दिंडी मुक्कामाच्या प्रसंगी चहापाण्याची व्यवस्था विश्व हिंदू परिषद बजरंग दल यांच्या वतीने करण्यात येऊन संतपूजनाद्वारे दिंडीचे पूजन करून स्वागत करण्यात आले.

मुक्कामी असलेल्या दिंड्यांना सकाळी सहा ते दहा वाजेपर्यंत जेवढे येईल सगळ्यांना चहाची व्यवस्था करण्यात आली होती.यावेळी युवा उद्योजक शुभमभाऊ उगले,गजानन गजानन गवारे,गंगाराम रासने,गणेश काळे, राजू डाके,अविनाश शिंदे सर,अरुण चव्हाण,नितीन गायकवाड,महेश शिंदे,विठ्ठलराव वने,पांडुरंग कदम, सोपानराव कदम,मयूर यादव,मयूर गोरडे,वैभव कोरडे, बालाजी सरोदे, संकेत परदेशी,गोरक्षक संतोषभाऊ पंडुरे महेश सुडके,सोमनाथ कुंडारे यांच्यासह सकल हिंदू समाजाचे प्रतिनिधी वारकरी उपस्थित होते



# आ. अर्जुन खोतकर यांनी घेतली तुपे कुटुंबीयांची सांत्वनपर भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील वांबोरी येथील सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब तुपे यांचे चिरंजीव व अशोकराव तुपे यांचे बंधू रमेश तुपे यांचे दुःखद निधन झाल्यामुळे जालन्याचे विद्यमान आमदार माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनी तुपे कुटुंबीयांच्या निवासस्थानी येऊन त्यांचे सांत्वन केले यावेळी टेम्प झा खोतकर परिवार सदैव तुमच्या कुटुंबीयांच्या दुःखात सामील असल्याचे सांगितले, यावेळी त्यांच्यासोबत जालना जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख पंडित दादा भुतेकर व जालना शिवसेना शहर प्रमुख विष्णू भाऊ, उमेश तुपे दीपक साखरे आणि सुनील शिंदे हे उपस्थित होते.



# महालक्ष्मी हिवरे येथून पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चांदा :** महालक्ष्मी हिवरे येथून पायी दिंडी चे पंढरपूर कडे मोठ्या उत्साहात भक्तीमय वातावरणात या नुकतेच प्रस्थान झाले. या प्रसंगी या दिंडी सोहळ्याला निरोप देण्यासाठी अनेक ग्रामस्थ उपस्थित होते दिंडी चालक ह.भ.प. नारायण महाराज गायके यांचा उपस्थितांच्या हस्ते शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी मुळा सहकारी साखर कारखान्याचे नवनिर्वाचित संचालक एकनाथ जगताप, राजेंद्र गायके रावसाहेब गायके गायकवाड ( सर ) म्हस्के , रघुनाथ सानप ( मेजर ) खंडोबा मंदिर देवस्थानचे उपअध्यक्ष पपु गायके, महादेव गायके, भारत पालवे, उध्दव सानप, अरुण रणबावरे, सोमनाथ पालवे, राजेंद्र जगताप, भिवसेन गायके राजकुमार पालवे, बद्रिनाथ गायके बंन्सी गायके यांच्या सह मोठ्या प्रमाणात भाविक उपस्थित होते.

# शैक्षणिक चळवळ उपक्रमांतर्गत गणवेशांचे वितरण




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील खळी येथील समाजभूषण लक्ष्मणभाऊ उगलमुगले यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'शैक्षणिक चळवळ' या सामाजिक उपक्रमांतर्गत सामाजिक कार्यकर्त्या सिताताई लक्ष्मणभाऊ उगलमुगले यांनी स्वखर्चाने खळी गावातील अंगणवाडी खळी, अंगणवाडी कांगणवाडी, अंगणवाडी लबडे वस्ती आणि अंगणवाडी चकोरवाडी येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांना १०० शालेय गणवेशांचे वितरण केले.

गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढावा आणि शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थी, पालक आणि अंगणवाडी सेविकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी भारत नागरे, बबन नागरे, सोमनाथ नागरे, सोमनाथ सानप, सोमनाथ नागरे, स्वाती नागरे, सखाराम बोऱ्हाडे, चंद्रभान घुगे, गोरख घुगे, नानासाहेब घुगे, शांताराम उगलमुगले, गणेश पालवे, विकास लबडे, राधिका घुगे , ललिता चकोर तसेच ग्रामस्थ, पालक, अंगणवाडी सेविका व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राहुरी विद्यापीठाच्या प्रकल्पग्रस्तांच्या भरतीसाठी मंत्रालयात बैठक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** कृषी विद्यापीठाच्या प्रकल्पग्रस्तांच्या भरती प्रक्रियेसंदर्भात काल महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या भरती प्रक्रियेसाठी टीएसएस कंपनीमार्फत परीक्षा घेण्यात आली असून त्याचा निकालही जाहीर करण्यात आला आहे. पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि कृषिमंत्री ना. दत्ता मामा भरणे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत प्रकल्पग्रस्त उमेदवारांना लवकरात लवकर सेवेत रुजू करून घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सेच, २००९ साली भरती झालेल्या प्रकल्पग्रस्तांना जुनी पेन्शन योजना लागू करणे तसेच २००५ च्या दरम्यान भरती झालेले बिगर प्रकल्पग्रस्त व अनुकंपाधारक कर्मचाऱ्यांनाही जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. यासंदर्भात योग्य मार्ग काढण्याच्या सूचना कृषिमंत्र्यांनी संबंधित विभागाला दिल्या. प्रकल्पग्रस्तांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि कर्मचाऱ्यांच्या हितासाठी शासन सकारात्मक असून, या सर्व मागण्यांवर लवकरच योग्य निर्णय घेतला जाईल.

# घराघरात न जाता एकाच ठिकाणी फॉर्म भरत असल्याचा बीएलओंवर आरोप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर ।** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण (एसआयआर-२०२६) अभियानात बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) घराघरात जाऊन पडताळणी करण्याऐवजी एकाच ठिकाणी बसून मतदारांकडून एन्युमरेशन फॉर्म भरून घेत असल्याचा आरोप मतदारांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांना बीएलओंकडे वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

एसआयआर अभियानांतर्गत मतदारांची घराघरात जाऊन पडताळणी करणे, एन्युमरेशन फॉर्म भरून घेणे आणि त्याची ऑनलाइन नोंद करणे ही बीएलओंची प्रमुख जबाबदारी आहे. यासाठी गंगापूर तालुक्यात २६५, तर वैजापूर विधानसभा मतदारसंघातील गावांसाठी ६३ असे एकूण ३२८ बीएलओंची नियुक्ती करण्यात आली आहे.

मात्र, अनेक गावांमध्ये बीएलओ घरभेटी न देता जिल्हा परिषद शाळा किंवा इतर सार्वजनिक ठिकाणी बसून फॉर्म भरून घेत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

**हलगर्जीपणाबाबत नोटिसा**


**गंगापूर विधानसभा मतदारसंघातील २३३ तसेच वैजापूर विधानसभा मतदारसंघातील ५२ गावांमध्ये कार्यरत १४ बीएलओंना घरभेट सर्वेक्षण, एन्युमरेशन फॉर्म संकलन आणि ऑनलाइन डिजिटायझेशनच्या कामात हलगर्जीपणा केल्याप्रकरणी निवडणूक प्रशासनाने कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत.**

त्यामुळे मतदारांना संबंधित ठिकाणी जाऊन फॉर्म भरावे लागत असून, काही शाळांमध्ये गर्दी वाढल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामकाजातही अडथळे निर्माण होत असल्याचे सांगितले जात आहे. निवडणूक आयोगाने या कामात निष्काळजीपणा अथवा विलंब झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईचे स्पष्ट निर्देश दिले असतानाही काही ठिकाणी नियमांचे पालन होत नसल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे घरभेटी टाळणाऱ्या बीएलओंची चौकशी करून आवश्यक कारवाई करावी, अशी मागणी मतदारांनी केली आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द•ख•ल

### चिंचोलीच्या कॉलेज ऑफ फार्मसीच्या दोन विद्यार्थिनींची पॅटसन्स फार्मास्युटिकल्समध्ये निवड



**लोणी :** डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सिंधू छाया कॅम्पस चिंचोली सिन्नर येथील महिला कॉलेज ऑफ फार्मसी येथील अंतिम वर्ष बी. फार्मसीच्या विद्यार्थिनींनी ऑफ-कॅम्पस प्लेसमेंटमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागामार्फत आयोजित ऑफ-कॅम्पस प्लेसमेंट प्रक्रियेत सिन्नर येथील अग्रगण्य औषधनिर्मिती कंपनी पॅटसन्स फार्मास्युटिकल्समध्ये वैष्णवी पाटील आणि प्रज्ञा चोथावे यांची यशस्वी निवड झाली आहे.अशी माहीती प्राचार्या डॉ.चारुशिला भंगाळे यांनी दिली. महाविद्यालयात विद्यार्थिनींना उद्योगाभिमुख शिक्षणाबरोबरच कौशल्य विकास, व्यक्तिमत्त्व विकास, मुलाखत तयारी, संवादकौशल्य आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण सातत्याने दिले जाते. त्यामुळे विद्यार्थिनींना देशातील नामांकित औषधनिर्मिती कंपन्यांमध्ये करिअरच्या उत्तम संधी उपलब्ध होत असून, या यशामुळे महाविद्यालयाच्या प्रभावी प्रशिक्षण व्यवस्थेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. या यशामागे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी राहुल सोंनटक्के आणि व्ही. डी. कुंडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थिनींना सातत्याने प्रोत्साहन व मार्गदर्शन केले.

### विंड बॉल मेजर चषक स्पर्धेत अष्टविनायक संघ विजेता



**शिरसगाव :** हरेगाव-नेवासा रोड येथे एकवाडी क्रिकेट ग्राउंडवर आयोजित करण्यात आलेल्या विंड बॉल मेजर चषक क्रिकेट स्पर्धेचा उत्साहात समारोप झाला. स्पर्धेत परिसरातील अनेक नामांकित संघांनी सहभाग घेतला. सर्व सामने अतिशय चुरशीचे आणि रंगतदार झाले. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अष्टविनायक आणि हेड अँड टेल या संघांमध्ये रोमांचक लढत झाली. या सामन्यात अष्टविनायक संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. हेड अँड टेल संघाने द्वितीय, तर उत्कर्ष ११ संघाने तृतीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेसाठी सुभेदार अलीम शेख (अशोकनगर), मेजर अन्वर शेख (अशोकनगर), मेजर शफिक सय्यद (हरेगाव), मेजर करीम शेख (खोकर), मेजर शैलेश ध्रुदेव (श्रीरामपूर) आणि मेजर योगेश शिरसाठ (हरेगाव) यांनी बक्षिसांचे प्रायोजकत्व केले. तसेच प्रवीण गायकवाड (हरेगाव), रवी आव्हाड, अफान मेमन, सागर चक्रनारायण आणि गिरीश परदेशी (ग्रामपंचायत सदस्य, उंदिरगाव) यांचे स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे योगदान लाभले.

### रेणुका आश्रमातर्फे रौप्य महोत्सवी माहूरगड पदयात्रा सोहळ्याचे आयोजन



**वडाळा महादेव :** श्रीरामपुर तालुक्यातील वडाळा महादेव येथील श्री क्षेत्र रेणुका देवी आश्रमाचे संस्थापक मौनयोगी सद्गुरू रेवणनाथ महाराज यांच्या प्रेरणेने सलग २५ व्या वर्षी वडाळा महादेव ते श्री माहूरगड अशा रौप्य महोत्सवी पायी पदयात्रा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आश्रमाच्या मुख्य विश्वस्त श्रीमती नलिनीदेवी जोशी (आईसाहेब) यांनी दिली आहे. गुरुपौर्णिमा झाल्यावर तिसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवार दि ३१ जुलै २०२६ रोजी सकाळी ७ वाजता पदयात्रा मार्गस्थ होणार आहे. नेवासा, छत्रपती संभाजीनगर,जालना, सिंदखेडराजा, मेहकर, मालेगाव, वाशिम,पुसद मार्गे तब्बल ४५० किलोमीटर पायी प्रवास करून दिंडी शनिवार दि १५ ऑगस्ट २०२६ रोजी गडावर पोहचणार आहे. रविवार दि १६ ऑगस्ट रोजी रौप्य महोत्सवी सांगता निमित्ताने गडावर नवचंडी याग, होमहवन व पुर्णाहूती आयोजित करण्यात आली आहे.माहूरगड परिक्रमा तसेच महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# आश्वी बुद्रुक अतिक्रमण वादावर पडदा

## विस्तार अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सकारात्मक तोडगा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथे ग्रामपंचायतीने राबवलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे निर्माण झालेला राजकीय आणि सामाजिक पेच अखेर प्रशासकीय मध्यस्थीनंतर सुटला आहे. विस्तार अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत पीडित समाजबांधवांच्या विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा होऊन आश्वासन देण्यात आल्याने या वादावर तूर्तास पडदा पडला आहे.

काही दिवसांपूर्वी आश्वी बुद्रुक ग्रामपंचायतीने गावात अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली होती. सरपंच नामदेव शिंदे यांनी ही कारवाई पूर्णपणे कायदेशीर आणि गावाच्या सर्वांगीण विकासासाठी असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र, दुसरीकडे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रिपाइं) आणि पीडित मांग गारुडी समाजबांधवांनी या कारवाईला विरोध दर्शवला होता. ही कारवाई जातीवाचक द्वेष आणि दडपशाहीतून केल्याचा आरोप करत समाजबांधवांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली होती.

या कारवाईच्या निषेधार्थ रिपाईचे तालुकाध्यक्ष आशिष शेळके यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी आश्वी पोलीस स्टेशनसमोर तीव्र आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची दखल घेत प्रशासनाने बुधवारपर्यंत तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते.

त्यानुसार बुधवारी ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात विस्तार अधिकारी काशिनाथ सरोदे आणि राजेंद्र कासार यांच्या प्रमुख उपस्थितीत विशेष बैठक पार पडली.

या बैठकीत समाजबांधवांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रशासनाने खालील बाबींवर सकारात्मक पावले उचलण्याचे आश्वासन दिले.

'महाराजस्व अभियाना' संदर्भात विशेष ग्रामसभेचे आयोजन करणे. पर्यायी मार्ग म्हणून सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती करून तिथे स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करणे. गावात फूटपाथ तयार करणे आणि सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे. समाजासाठी स्वतंत्र दफनभूमी उपलब्ध करून देणे.

प्रौढ शिक्षण शिबिर आणि स्वच्छता जनजागृती मोहीम राबवणे. स्वतंत्र पाण्याची टाकी आणि समाज हॉल (सभागृह) बांधणे.

या बैठकीला विस्तार अधिकारी काशिनाथ सरोदे, राजेंद्र कासार, आश्वी पोलिस स्टेशन पोनि सुदाम शिरसाठ , सहाय्यक पो नि दिपक बर्डे , रिपाई तालुकाध्यक्ष आशिष शेळके, सरपंच नामदेव शिंदे, उपसरपंच बाळासाहेब मदने, ग्रामपंचायत सदस्य अभिषेक ताजणे, संतोष ताजणे, सागर गायकवाड, किरण गायकवाड, लाडू उर्फ संदीप गायकवाड, भारत गायकवाड, बाळासाहेब कदम, अमोल राखपसरे यांच्यासह समाजबांधव आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीनंतर विस्तार अधिकारी, सरपंच, उपसरपंच आणि ग्रामस्थांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन अतिक्रमित भागाची पाहणी केली. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता झाल्यास गावातील सामाजिक सलोखा अधिक दृढ होईल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

### रामपूरफाटा येथील शाळेस शैक्षणिक साहित्य भेट



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** कोल्हार भगवतीपूर येथील रामपूर फाटा येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना स्कायलाईट ग्रुप कोल्हार यांच्या वतीने विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य प्रदान करण्यात आले. स्कायलाईट ग्रुपचे सदस्य अरुण फोफसे यांचे चिरंजीव शौर्य याच्या वाढदिवसाच्या निमित्ताने रामपूरफाटा शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना स्पोर्टस ड्रेसचे वाटप करण्यात आले. शौर्यच्या वाढदिवसाला इतर खर्च करण्यापेक्षा जि.प.प्राथ.शाळा, रामपूरफाटा या शाळेला दोन फॅन व ऑफिस कामासाठी प्रिंटर भेट दिले. यावेळी स्कायलाईट ग्रुपचे सदस्य शरद खर्डे, निलेश खर्डे, सचिन राऊत, वसंतराव खर्डे शिवाजी शिवनकर, निलेश विधाते, शंकर शिवणकर, नानासाहेब गायकवाड आदी उपस्थित होते.

# मुलांना शिक्षकांचा मार खाऊ द्या

## अन्यथा पोलिसांचा मार खावा लागेल; एपीआय दीपक बर्डे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**झरेकाठी :** सध्याच्या काळात विद्यार्थ्यांची शिस्त बिघडत चालली आहे. पालकांनी आपल्या पाल्याला शिक्षकांनी दिलेला शिस्तीचा मार खाऊ द्यावा, जेणेकरून भविष्यात त्यांच्यावर पोलिसांचा मार खाण्याची किंवा गुन्हेगारीच्या वाटेवर जाण्याची वेळ येणार नाही, असे परखड मत आश्वी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक बर्डे यांनी व्यक्त केले.

संगमनेर तालुक्यातील पानोडी येथील सरदार थोरात विद्यालयात आयोजित विशेष पालक मेळाव्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्कूल कमिटीचे अध्यक्ष विनायकराव थोरात होते. तर संरपच गणपत हजारे , सोसायटी चेअरमन बबनराव कराड , बाळासाहेब सानप, विठ्ठल घोडेकर, पत्रकार राजेश गायकवाड, सोमनाथ डोळे, संतोष चव्हाण, संकेत तांबे, शंकर जाधव यांच्यासह पालक विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी बर्डे म्हणाले की, विद्यार्थी एकदा का पोलीस रेकॉर्डवर नाव आले की करिअर उध्वस्त होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष द्यावे. तर तुकाराम मुंडे यांच्यासारख्या उच्चशिक्षित व्यक्तींचा आदर्श ठेवून अधिकारी, डॉक्टर, वकील, इंजिनिअर, मंत्री व्हा. तसेच मुलींच्या सुरक्षेसाठी 'डायल ११२' या हेल्पलाइनची माहिती देत त्यांनी 'गुड टच-बॅड टच'बाबत मार्गदर्शन केले. तर भगवानराव थोरात यांनी सांगितले की, मुलांवर पालकांचा आणि शिक्षकांचा योग्य धाक असणे गरजेचे आहे. तर विनायकराव थोरात यांनी शक्तीचा वापर विधायक कामांसाठी करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक पोपट सोनवणे यांनी केले, तर सूत्रसंचालन गणेश जाधव यांनी केले. या मेळाव्याला मोठ्या संख्येने पालक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### त्रिमूर्ती पब्लिक स्कूल व ज्यूनिअर कॉलेजचा २८ वा 'वर्धापन दिन'साजरा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** नेवासा फाटा येथील त्रिमूर्ती पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचा २८ वा वर्धापन दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात झाला.सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन विविध कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले.

राजमाता सभागृहात झालेल्या कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थी/विद्यार्थिनींचे वाढदिवस,विद्यार्थी मनोगते,तसेच संगीत विभागाने सुंदर गीतगायन सादरीकरण करून सर्व विद्यार्थी व शिक्षकांचे मने जिंकली.याप्रसंगी स्वर्गीय साहेबराव घाडगे पाटील साहेबांच्या जन्म जयंती निमित्त घेतलेल्या रंगभरण,हस्ताक्षर,निबंध स्पर्धा,पोस्टर मेकिंग रांगोळी स्पर्धेचे पारितोषिक वितरण ही करण्यात आले. इंडियन नॅशनल ऑलंपियाड परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय प्रमाणपत्र,सन्मान चिन्ह व बक्षीसे देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. वर्धापन दिनानिमित्त त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संस्थेच्या अध्यक्षा ड.सुमतीताई साहेबरावजी घाडगे पाटील यांनी 'घाडगे पाटील साहेबांच्या स्वप्नातील अधिकारी व आंतरराष्ट्रीय खेळाडू त्रिमूर्ती मधून घडावेत ही इच्छा व्यक्त करून उज्वल भविष्यासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या. प्रा. दिपाली बाविस्कर यांनी घाडगे साहेबांचा जीवनप्रवास सांगून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. सर्व गुणसंपन्न, गुणवत्ताधारक विद्यार्थी त्रिमूर्तीमधून घडवले जाईल याद्वारे साहेबांचे विचार पुढे घेऊन जाऊ अशी ग्वाही यावेळी बोलतांना दिली वर्धापन दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रम प्रसंगी त्रिमूर्ती संकुलाच्या अध्यक्षा अ‍ॅड. सुमती घाडगे, अ‍ॅड.स्नेहल घाडगे-चव्हाण, डॉ. श्रुती आमले, चेतन चव्हाण, डॉ. गौरव आमले पाटील, अधिरथ पवार, प्रा. दिपाली बाविस्कर, प्रा. सोपानराव काळे, प्रा. श्रीदेवी नायर, दत्तात्रय वांढेकर, ताके सर, परमेश्वर कसाळ यांच्यासह त्रिमूर्ती पब्लिक स्कूलचे सर्व सदस्य व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ४० वर्षांची प्रतीक्षा संपणार...
### संगमनेरमध्ये लवकरच आरटीओ कार्यालय

#### आ. खताळ यांच्या पाठपुराव्याला यश : रमेश काळे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर :** संगमनेर आणि अकोले तालुक्यातील नागरिकांसाठी महत्त्वाची ठरणारी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची (आरटीओ) मागणी अखेर मार्गी लागली असून, संगमनेर येथे लवकरच स्वतंत्र आरटीओ कार्यालय सुरू होणार आहे. या कार्यालयासाठी आमदार अमोल खताळ यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केल्याचे सांगण्यात आले. या निर्णयामुळे वाहन परवाना, वाहन नोंदणी, वाहन पासिंग तसेच आरटीओशी संबंधित विविध कामांसाठी नागरिकांना जिल्हा मुख्यालयावर जाण्याची गरज कमी होणार आहे. त्यामुळे वेळ आणि खर्चाची बचत होऊन संगमनेर व अकोले तालुक्यातील वाहनधारक, शेतकरी, व्यावसायिक आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. दरम्यान, या निर्णयाचे स्वागत करत शिवसेना (शिंदे गट) उपजिल्हाप्रमुख रमेश काळे यांनी आमदार अमोल खताळ यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. जे काम गेल्या ४० वर्षांत झाले नाही, ते आमदार अमोल खताळ यांनी अवघ्या दीड वर्षांत करून दाखवले, असे म्हणत त्यांनी विरोधकांवर टीका केली. दीर्घकाळ सत्तेत राहूनही नागरिकांची मूलभूत गरज पूर्ण करण्यात अपयश आल्याचा आरोप त्यांनी केला. संगमनेरमध्ये आरटीओ कार्यालय सुरू होणार असल्याच्या वृत्तामुळे तालुक्यात समाधानाचे वातावरण असून, स्थानिक पातळीवर परिवहन सेवा उपलब्ध झाल्याने नागरिकांची मोठी गैरसोय दूर होणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### मध्यमेश्वर भगवान पायी पालखी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** हरि आणि हरयांच्या ऐक्याचा संदेश देणाऱ्या तीर्थक्षेत्र नेवासा येथील प्रवरानदीच्या तीरावर असलेल्या मध्यमेश्वर मंदिरातील मध्यमेश्वर भगवान पायी पालखी दिंडीचे श्री मध्यमेश्वर देवस्थानचे महंत बालयोगी ऋषीनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी दि.१५ जुलै रोजी पंढरपूरकडे प्रस्थान झाले. सर्वात उशिरा निघणारी आणि दहा दिवसामध्ये पंढरपूरमध्ये पोहचणारी दिंडी म्हणून या दिंडीची ओळख आहे.

ब्रम्हलीन योगी मनोहरनाथ बाबा व वैकुंठवाशी हभप नासिकेत महाराज कोरेकर, कै.पंढरीनाथ हारदे गुरुजी यांच्या कृपा आशिर्वादाने निघालेल्या दिंडीचे हे ४० वे वर्ष आहे. दिंडीच्या प्रस्थानाच्या पूर्वी महंत बालयोगी ऋषिनाथ महाराज यांच्या हस्ते मध्यमेश्वर शिवलिंगास व ब्रम्हलिन योगी मनोहरनाथ बाबांच्या मूर्तीस वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घालण्यात येऊन पूजन करण्यात आले. यावेळी दिंडीमध्ये चालक हरि भक्त परायण विजय महाराज पवार, गोपीनाथ महाराज कोरेकर, दिनकर महाराज हारदे, गणेश महाराज तनपुरे, शशिकांत महाराज कोरेकर, कैलास महाराज तनपूरे, सुभाष दळवी, बबनराव वाखुरे,सीताराम कोकणे, कैलास तनपूरे, डॉ. मुकुंद हारदे कचरू हेलाडे, राजू चव्हाण, अनिल तनपूरे यांच्यासह सुमारे तीनशे वारकऱ्यांनी सहभाग नोंदवला आहे. मुंबादेवी मंदिर प्रांगणात दिंडीचे आगमन झाल्यावर महंत योगी बृहस्पतीनाथ महाराज,गोरक्षक संतोष पडूरे, मोहिनीराज सरगैये,विजय यादव व शिवाजीनगर भक्त परिवार व परिसरातील महिलांनी दिंडीतील पालखीचे पूजन करून दिंडीचे स्वागत केले.

# विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण जोपासण्यासाठी पालकांनी पुढाकार घ्यावा : शालिनीताई विखे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**प्रवरानगर :** शिक्षणासोबत विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण, नियोजन क्षमता आणि निर्णयक्षमतेचा विकास होणे तितकेच महत्त्वाचे आहे. विद्यार्थी परिषदेसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शालेय स्तरावरच नेतृत्वाची संधी मिळते. तसेच विद्यार्थ्यांना मोबाईलच्या अतिरेकी वापरापासून दूर ठेवण्यासाठी पालकांनी विशेष प्रयत्न करावेत आणि घराघरात वाचन संस्कृती रुजविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे यांनी केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील इंटरनॅशनल स्कूल व ब्रिलियंट बर्ड्स स्कूल यांच्या वार्षिक विद्यार्थी परिषदेच्या पदग्रहण समारंभात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. यावेळी प्राचार्या दीपाली गव्हाणे, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना विखे म्हणाल्या की, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा केवळ शैक्षणिक नव्हे, तर सर्वांगीण आणि संस्कारक्षम विकास घडविण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात आहे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या आवडीनिवडी ओळखून त्याला प्रोत्साहन देण्याचे कार्य शिक्षक विविध उपक्रमांच्या माध्यमातून करत आहेत. संस्थेचे अध्यक्ष तथा राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत नेतृत्व, शिस्त आणि सामाजिक जाणीव देण्याचा संस्थेचा दृष्टिकोन आहे. पालकांना आवाहन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेला एक चांगले पुस्तक भेट देण्याची परंपरा सुरू करावी. त्यामुळे शाळांची ग्रंथालये समृद्ध होतील आणि वाचन संस्कृतीलाही चालना मिळेल. जगाशी स्पर्धा करण्यासाठी विद्यार्थ्यांनी शिस्त, नियमांचे पालन आणि सातत्यपूर्ण वाचन यांना प्राधान्य द्यावे. यासाठी पालकांनीही विद्यार्थ्यांसोबत नियमांचे पालन करून आदर्श निर्माण करावा.


### जाहीर प्रगटन

समस्त गावकरी देशमुखवाडी ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री/श्रीम नाना तुकाराम चव्हाण रा मांजरगाव ता करमाळा जि सोलापुर यानी मुलगा नामे श्री/श्रीम केशव नाना चव्हाण या नावे जन्म । मृत्यू प्रमाणपत्र मीळणे बाबत मागणी केलेली आहे. सदर व्यक्तीचा जन्म / मृत्यू देशमुखवाडी ता. कर्जत जि. अहिल्यानगर या ठीकाणी दि १५/०५/२०११ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबंधीत दि १७/११/२०२५ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे. वरील व्यक्तीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतिनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी

शिक्का

सही/-
रवि सतवन
तहसिलदार कर्जत


### अनिल कोळसे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई या राज्यातील अग्रगण्य पत्रकार संघटनेच्या उत्तर नगर जिल्हाध्यक्ष (अहिल्यानगर) या महत्त्वपूर्ण पदावर पत्रकार अनिल कोळसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे प्रदेश अध्यक्ष निलेश सोमाणी व राज्य संघटक संजय भोकरे यांच्या सूचनेनुसार हा निर्णय घेण्यात आला असून, प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी अधिकृत पत्राद्वारे ही नियुक्ती जाहीर केली. पत्रकारिता क्षेत्रात गेली २० ते २२ वर्षे कार्यरत असलेले अनिल कोळसे हे निर्भीड, परखड आणि सामाजिक भान जपणारे पत्रकार म्हणून ओळखले जातात.

त्यांनी विविध सामाजिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवत पत्रकारितेची जबाबदारी समर्थपणे पार पाडली आहे.


### जाहीर निविदा

**ग्रामपंचायत बाहदरपुर ता.कोपरगाव जि.अहिल्यानगर**

ग्रामपंचायत बाहदरपुर ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर येथील कामाचे सन २०२५/२६ साठी नोंदणीकृत, ठेकेदार, पुरवठादार यांच्याकडून सीलबंद निविदा मागवण्यात येत आहे.

| अ. क्र | योजनेचे नाव | कामाचे नाव | अंदाजपत्रीकिय रक्कम | निविदा फी | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५ वा वित्त आयोग | मौजे बहादरपुर येथे सोमनाथ खकाळे घर ते अर्जुन रहाणे घर आरसीसी बंदिस्त गटार करणे. | ९ लाख ९० हजार | ३००रू | सु.बे |

अटी व शर्ती – १) निविदा फार्म माहितीपत्रक दि.१६/७/२०२६ते २२/७/२०२६ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) बी १ निविदा दि. २३/७/२०२६ रोजी स ११ वा उघडण्यात येईल. ३) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी
बाहदरपुर ग्रामपंचायत

सरपंच
ता.कोपरगाव जि.अहिल्यानगर

## पान १ वरुन

### संगमनेरमध्ये अल्पवयीन मुलीवर अत्याचार;

तिच्यावर जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले.हा धक्कादायक प्रकार पीडितेच्या नातेवाईकांनी पाहिला असता, आरोपीने त्यांना व पीडितेला धमकावले. तुझ्या आईकडे जाऊ नको, नाहीतर कोण काय करते मी बघतो आणि एखाद्याला मारून टाकीन, अशी जीवे मारण्याची थेट धमकी आरोपीने दिली.या घटनेनंतर पीडितेच्या आईने तात्काळ संगमनेर शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी आरोपी गणेश चंद्रभान गायकवाड यांच्याविरुद्ध गुन्हा रजि. नं. ६८४/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता (इछड): कलम ६४, ३५१ ( २)बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (पोक्सो) कलम ४, ६, ८, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे आणि पोलीस निरीक्षक बारवकर यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संतोष पगारे करत आहेत.

### ४८ हजार कोटींची वीजबिल माफी

उद्धव ठाकरे यांच्यावर अप्रत्यक्ष टीका करत मुख्यमंत्री म्हणाले, मी एखाद्या खोलीत बसून निर्णय घेणारा नाही. माझ्या घरी वडिलोपार्जित शेती आहे. धानाची शेती केली आहे, ऊस पिकवला आहे, गूळ तयार केला आहे, चिखलात रोपणी केली आहे. शेतीचे प्रश्न मी अनुभवले आहेत.कर्जमाफीच्या निर्णयामागे कोणतेही निवडणूक राजकारण नसल्याचे सांगताना त्यांनी महायुती सरकारने दिलेले आश्वासन पूर्ण केले असल्याचा दावा केला. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन देण्याचा निर्णयही सरकारने कायम ठेवला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### 'बेग टोळी'वर मोक्का लावण्याच्या मागणीसाठी सर्वपक्षीय महामोर्चा

पोलीस आणि महसूल प्रशासनावर कडाडून हल्ला चढवला. ते म्हणाले गोदावरी आणि प्रवरा नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर बेसुमार वाळूची लूट सुरू आहे. प्रशासनाने ही वाळूतस्करी तात्काळ बंद करावी. येथे कोणी कोणाचा 'बाप' नाही आणि श्रीरामपूरकरांचा बाप होण्याचा प्रयत्नही करू नये. येथील सर्वसामान्य जनता हीच खरी बाप आहे. जनतेची ही खरी ताकद काय असते, हे आजच्या गर्दीने दाखवून दिले आहे.आमदार ओगले यांनी पुढे गंभीर आरोप करत सांगितले की, सध्या एमआयडीसी भागात लघुउद्योजकांची लूट केली जात आहे. बड्या उद्योगपतींकडून खंडणी वसूल केली जात असून, डॉक्टरांनाही वर्गणीच्या नावाखाली धमकावले जात आहे. लोकांच्या जमिनी हडप केल्या जात असून, पोलीस मात्र बघ्याची भूमिका घेत आहेत. आमचा हत्येशी संबंध नाही असे म्हणणारी 'बेग टोळी' काय लाई धुतल्या तांदळाची आहे? जनता येडी नाही! जोपर्यंत बेग टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई होत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही. केवळ बंद शिथिल केला जाईल, मात्र विविध मार्गांनी आंदोलन सुरूच राहील.यावेळी बोलताना प्रकाश चित्ते यांनी अत्यंत संवेदनशील आणि गंभीर मुद्द्यांवर प्रकाश टाकला.ते म्हणाले, आज हिंदू गुंडांपासूनच हिंदू समाजाला भीती निर्माण झाली आहे. बाहेरील शक्ती जिल्ह्यामध्ये हिंदुत्वाचा नवा प्रयोग करू पाहत आहेत. येथे गोल टोपीवाल्यांची भीती कमी, पण नकली उपरणेवाल्यांची दहशत जास्त झाली आहे. एमआयडीसी भागातील एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार करण्यात आला होता. या प्रकरणातील आरोपी याच 'बेग टोळी'शी संबंधित होते. पीडितेच्या आईने तक्रार करण्याचा प्रयत्न केला असता, तत्कालीन पोलीस अधिकारी समाधान सोळंके यांनी गुन्हेगाराची पाठराखण केली. मुलगी वयात आली की तिचे लग्न आरोपीसोबत लावून देऊ, पोलीस स्टेशन आणि कोर्टाच्या पायऱ्या चढू नका, असा दबाव पोलिसांनीच आणल्याचा धक्कादायक आरोप चित्ते यांनी केला. याच पीडितेच्या भावाला बेग टोळीच्या २५ ते ३० जणांनी तहसील आवारात बेदम मारहाण करून पाटात फेकून दिले होते, त्याने कसाबसा जीव वाचवला. तसेच नगरपालिकेतील एका कर्मचाऱ्याने बेग टोळीकडून व्याजाने पैसे घेतले होते. व्याजाच्या पैशांसाठी घरात घुसून धमकावल्याने हताश होऊन त्या कर्मचाऱ्याने आत्महत्या केली, अशी टोळीची भयानक कृत्ये त्यांनी जाहीरपणे वाचून दाखविली. चौथ्या दिवशी बंद मागे घेण्यात आला.

### १३ रेखांकन मंजुरी प्रकरणांत अनियमितता

माहितीचीही पडताळणी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. शेख यांनी शासनाकडे आयुक्त यशवंत डांगे यांचे ७ जुलै २०२६ रोजीचे पत्र अमान्य करणे, संबंधित १३ रेखांकन मंजुऱ्या रद्द करणे, चौकशी निष्पक्षपणे पूर्ण करणे तसेच तत्कालीन सहाय्यक संचालक राम चारठाणकर, तत्कालीन आयुक्त पंकज जावळे, विद्यमान आयुक्त यशवंत डांगे आणि नगररचनाकार वैभव जोशी यांच्यावर कायदेशीर कारवाई करून संबंधित परवानग्या रद्द करण्याची मागणी केली आहे.

### कर्जतचे उपनगराध्यक्ष संतोष मेहेत्रेंवर अविश्वास!

बाजूने उपस्थित असलेले ११ ही नगरसेवकांनी मतदान करीत बहुमताने सदरचा ठरावा पास केला. या विशेष सभेनंतर बोलताना गटनेते सतीश पाटील म्हणाले की, मी एकूण १५ नगरसेवक गटाचा गटनेता असून उपनगराध्यक्ष संतोष मेहेत्रे यांच्यावरील अविश्वास ठराव बैठकीस सर्वानाच उपस्थित राहण्याचा अधिकृत व्हीप देखील जारी केला होता. मात्र १५ पैकी ६ नगरसेवक या बैठकीस अनुपस्थित राहिले. त्यांच्यावर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे शिस्तभंग यासह अपात्रतेची कार्यवाही करण्यासंबंधी मागणी करणार असल्याचे सांगितले.

# बोटा गटात काँग्रेसला खिंडार

## युवक काँग्रेस महासचिवांसह कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** तालुक्यातील वरुडी पठार येथे काँग्रेसला मोठा राजकीय धक्का बसला असून युवक काँग्रेसचे तालुका महासचिव सुमित फटांगरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यामुळे बोटा गटात काँग्रेसला आमदार अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. या प्रवेशामुळे वरुडी पठार परिसरात महायुतीची ताकद अधिक बळकट झाली असून काँग्रेसच्या गोटात खळबळ उडाली आहे.

भाजप युवा मोर्चाचे उपाध्यक्ष शैलेश फटांगरे यांच्या नेतृत्वाखाली युवक काँग्रेसचे तालुका महासचिव सुमित फटांगरे, वरुडी पठार तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष संतोष फटांगरे, माजी ग्रामपंचायत सदस्य भरत जाधव तसेच सामाजिक कार्यकर्ते अनिल फटांगरे यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी नव्याने पक्षात दाखल झालेल्या सर्व कार्यकर्त्यांचे आमदार खताळ यांनी स्वागत करत त्यांना पक्षाचा दुपट्टा परिधान करून शुभेच्छा दिल्या.

आ. खताळ यांनी सांगितले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विकासाला प्राधान्य देणारे निर्णय घेतले जात आहेत. विकासाच्या या भूमिकेवर विश्वास ठेवून विविध पक्षांतील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर शिवसेनेत प्रवेश करत आहेत. वरुडी पठारातील कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे महायुतीची ताकद आणखी वाढणार असून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. शैलेश फटांगरे यांनीही यावेळी गावाच्या विकासासाठी पक्षसंघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला. नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनीही विकासाच्या राजकारणाला पाठिंबा देण्यासाठी शिवसेनेची वाट निवडल्याचे सांगितले. या पक्षप्रवेशामुळे बोटा गटातील राजकीय समीकरणांना नवी दिशा मिळणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून संगमनेर तालुक्यात विविध गावांतील पदाधिकारी व कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करत असून आमदार अमोल खताळ यांच्या नेतृत्वाखाली पक्षसंघटना दिवसेंदिवस अधिक मजबूत होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

**कामाची शैलीच ठरतेय शिवसेनेतील प्रवेशाचे कारण !**

आ. खताळ हे सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेले लोकप्रतिनिधी असल्याने तळागाळातील नागरिकांच्या अडचणी व प्रश्नांची त्यांना चांगली जाण आहे. मतदार संघातीलच नव्हे, तर इतर भागातील नागरिकही आपल्या कामासाठी त्यांच्या कार्यालयात येतात आणि प्रामाणिकपणे पाठपुरावा करून अनेकांची कामे मार्गी लागतात, असा अनुभव नागरिक व्यक्त करत आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यालयात नेहमीच नागरिकांची मोठी गर्दी असते. त्यांच्या कामकाजाची पद्धत आणि विकासाभिमुख भूमिका पाहून अनेक कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

### ग्रंथालय समृद्धी योजनेच्या निधीतून १.४५ लाखांची पुस्तकांची भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** जिल्हा मराठा शिक्षण संस्थेच्या वतीने ग्रंथालय समृद्धी योजनेच्या निधीतून निधीतून सुमारे १ लाख ४५ हजार रुपयांची स्पर्धा परीक्षा व शैक्षणिक संदर्भातील विविध पुस्तके श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, देवळाली प्रवरा यांना भेट देण्यात आली.

या उपक्रमांतर्गत एमपीएससी, यूपीएससी व इतर स्पर्धा परीक्षांची पुस्तके, नीट (छएएढ), सीईटी (उएढ), जेईई (गएए) परीक्षांची मार्गदर्शक पुस्तके, तसेच कथा, कादंबऱ्या आणि इतर संदर्भग्रंथ विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.पुस्तक वितरणाचा शुभारंभ पत्रकार राजेंद्र उंडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य मकरंद रायते, प्रा. गणेश भांड, मुख्य लिपिक विलास पारधे, ग्रंथपाल आर. बी. भिटे, नागेश दळवी, सुरेश देठे आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना या पुस्तकांचा जास्तीत जास्त उपयोग करून स्पर्धा परीक्षांची प्रभावी तयारी करण्याचे आवाहन केले. विशेषतः इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसह सर्व विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील या पुस्तकांचा लाभ घेऊन शैक्षणिक यश संपादन करावे व विद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, असेही राजेंद्र उंडे सांगितले.

### साईछत्र उद्योग समूहाकडून वारकऱ्यांना नाश्त्याचे वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** श्री संत निवृत्ती महाराज पालखी सोहळ्यानिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी श्री साई छत्र उद्योग समूह व गणपतराव भोसले व यांच्या मित्र परिवाराच्या वतीने मिरपूर येथे भव्य नाश्ताचे आयोजन करण्यात आले. पालखी सोहळ्याचे मिरपूर येथे आगमन होताच सुमारे १० हजार वारकऱ्यांना गरमागरम वडापाव, जलेबी आणि पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात आले.



वारकरी संप्रदायात सेवा हीच ईश्वरभक्ती मानली जाते. याच सेवाभावातून राबविण्यात आलेल्या या उपहाराचा हजारो वारकऱ्यांनी लाभ घेतला. स्वादिष्ट नाश्ता आणि उत्कृष्ट नियोजनामुळे वारकऱ्यांनी आयोजकांचे मनापासून कौतुक केले.

या सेवाभावी उपक्रमासाठी गणपतराव भोसले व त्यांच्या सर्व मित्र परिवाराने मोलाचे योगदान देत संपूर्ण व्यवस्थापनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी स्वयंसेवकांनी दिवसभर अथक परिश्रम घेत शिस्तबद्ध पद्धतीने नाश्त्याचे वाटप केले.

मुसळधार पावसाची शक्यता लक्षात घेऊन भाविकांच्या सोयीसाठी मोठा मंडप, बसण्याची व्यवस्था आणि नियोजनबद्ध सेवा उभारण्यात आली होती. स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध पद्धतीने वडापाव, जलेबी, पाणी बॉटल हे पदार्थ वारकऱ्यांना वितरित केले.संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन श्री साई छत्र उद्योग समूह, गणपतराव भोसले आणि त्यांच्या सर्व मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले होते.

### कारेगाव सोसायटीचा निकाल 'कृत्रिम'; लोकसेवा विकास मंडळाचा दावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान ।** कारेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या २०२६-३१ या पंचवार्षिक संचालक मंडळ निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर लोकसेवा विकास मंडळाने निकालाचा आदर व्यक्त करत निवडणुकीचे विश्लेषण प्रसिद्ध केले आहे. या विश्लेषणात वाढीव सभासदांच्या मतदानामुळे निकालावर परिणाम झाल्याचा दावा मंडळाने केला आहे. मंडळाच्या माहितीनुसार, संस्थेचे एकूण १,५५६ सभासद असून त्यापैकी ७०४ सभासद मतदानासाठी पात्र होते. एकूण ६६४ मतदारांनी मतदान केले. त्यातील २६ मते बाद ठरल्याने ६३८ मते वैध ठरली. जनरल गटातील आठ जागांसाठी लोकसेवा विकास मंडळाच्या उमेदवारांना सरासरी २५६, तर विजयी पॅनेलच्या उमेदवारांना सरासरी ३६७ मते मिळाल्याचे मंडळाने नमूद केले आहे. मात्र, संस्थेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या १७२ सभासदांच्या मतदानामुळे निकालावर निर्णायक परिणाम झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या १७२ मतांमध्ये बाहेरगावातील ७५ आणि गावातील ९७ सभासदांचा समावेश असल्याचे मंडळाने म्हटले आहे.

ही वाढीव मते वगळल्यास विजयी पॅनेलची सरासरी मतसंख्या १९५ पर्यंत येते, तर लोकसेवा विकास मंडळाची सरासरी २५६ राहते, असा दावा करत हा विजय नैसर्गिक नसून कृत्रिम स्वरूपाचा असल्याचे मंडळाने म्हटले आहे. तथापि, निवडणुकीचा निकाल स्वीकारत लोकसेवा विकास मंडळाने सभासद, मतदार आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले असून, संस्थेतील पारदर्शकता, सभासदांचे हक्क आणि विकासासाठी पुढेही अधिक ताकदीने काम सुरू ठेवणार असल्याची भूमिका व्यक्त केली. तसेच निवडणुकीत योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांचेही मंडळाने अभिनंदन केले.

### श्री गुंड्या बाबा जीर्णोद्धारची प्राणप्रतिष्ठा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** १९६२ मध्ये तालुक्यातील तुर्काबाद येथून कानोबाचे भक्त असलेले गुंड्या बाबा यांच्या दोन मूर्ती आणून तालुक्यातील बाबरगांव येथे श्री गुंड्या बाबा संस्थानचे जीर्णोद्धारचे ग्रामस्थांकडून प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी सुरेश व गीता सातपुते यांच्या हस्ते सपत्नीक महापूजा करण्यात आली कृष्णा मिस्त्री यांनी मूर्तीचा वटा बांधला, रामेश्वर सातपुते व कृष्णा मिस्त्री यांचे अमूल्य योगदान राहिले यावेळी

तंटामुक्त अध्यक्ष अरुण पठाडे,संस्थापक अध्यक्ष मुरलीधर नाना सातपुते, संतोष सातपुते, दादाभाऊ सातपुते, हरी सातपुते, भाऊसाहेब दादा दंडे गणपत सातपुते, भागिनाथ सातपुते, परभत सातपुते. पूजा - देवळे गुरुजी.आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### मानधनाअभावी अंगणवाडी सेविकांचा 'मातृत्व वंदन' योजनेच्या कामावर बहिष्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर । विशेष प्रतिनिधी** पंतप्रधान मातृत्व वंदन योजनेअंतर्गत ऑनलाइन अर्ज भरूनही शासनाने जाहीर केलेले मानधन अद्याप मिळाले नसल्याच्या निषेधार्थ वैजापूर तालुक्यातील अंगणवाडी सेविकांनी योजनेच्या कामावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचे निवेदन महाराष्ट्र राज्य पूर्व प्राथमिक (अंगणवाडी) शिक्षक भारती संघटना, शाखा वैजापूरच्या वतीने बालविकास प्रकल्प अधिकारी (सीडीपीओ) यांना देण्यात आले आहे.



शासनाच्या निर्णयानुसार, पंतप्रधान मातृत्व वंदन योजनेतील लाभार्थी गर्भवती महिलांचे ऑनलाइन अर्ज भरण्याची जबाबदारी अंगणवाडी सेविकांवर सोपविण्यात आली होती. प्रत्येक अर्जामागे २५० रुपये मानधन देण्याची तरतूद असतानाही अनेक सेविकांना अद्याप मोबदला मिळालेला नसल्याचा संघटनेचा दावा आहे.

यामुळे अंगणवाडी सेविकांमध्ये तीव्र नाराजी असून, थकीत मानधन मिळेपर्यंत योजनेचे नवीन अर्ज भरणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संघटनेच्या जिल्हाध्यक्ष माया म्हस्के यांनी, ''आम्ही शासनाने दिलेले काम प्रामाणिकपणे पूर्ण केले आहे. मात्र, जाहीर केलेला मोबदला मिळालेला नसल्याने न्याय मिळेपर्यंत कामावर बहिष्कार कायम राहील,'' असे सांगितले.

या निवेदनाची प्रत जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांनाही पाठविण्यात आली असून, निवेदनावर तालुका संघटक अश्विनी सोनवणे व जिल्हाध्यक्ष माया म्हस्के यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### जमीनीच्या वादाचा न्यायालयाकडून बहिणीच्या बाजूने निकाल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** नारायणपूर येथील ३३ गुंठे वडिलोपार्जित जमिनीवरून तब्बल १७ वर्षापासून सुरू असलेल्या जमीनीच्या वादात न्यायालयाने संबंधित महिलेच्या बाजूने निकाल देत मालमत्तेवरील तिचा कायदेशीर हक्क मान्य केला. मात्र, न्यायालयीन विजय मिळाल्यानंतरही बहिणीने स्वखुशीने करारनामा करून ती जमीन आपल्या भावाच्या नावावर परत करुन मला माझा भाऊ परत मिळाला, यापेक्षा मोठी संपत्ती दुसरी नाही, या तिच्या शब्दांनी उपस्थितांचे डोळे पाणावले. या वादामुळे गेली अनेक वर्षे भाऊ-बहिणींच्या नात्यात दुरावा निर्माण झाला होता.

न्यायालयीन संघर्ष, गैरसमज आणि कौटुंबिक मतभेदांमुळे कुटुंबातील नाती तुटण्याच्या उंबरठ्यावर पोहोचली होती. मात्र, नारायणपूर गावचे सरपंच नासेर पटेल यांनी पुढाकार घेत दोन्ही बाजूंमध्ये संवादाचे पूल बांधले. त्यांना सुलेमान पटेल, सबजर पटेल, नय्युम पटेल आणि मजमुद्दीन पटेल यांचेही सहकार्य लाभले. अनेक बैठका, समुपदेशन आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे दोन्ही कुटुंबांतील गैरसमज दूर झाले.

परिणामी, वर्षानुवर्षे तुटलेले नाते पुन्हा प्रेमाच्या धाग्याने जोडले गेले. जवळपास तीन दशकांहूनअधिक काळ सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या सरपंच नासेर पटेल यांनी या वादातही सामंजस्याचा मार्ग स्वीकारत कुटुंबाला पुन्हा एकत्र आणले. नारायणपूरमध्ये घडलेली ही घटना केवळ न्यायालयीन वादाचा शेवट नसून, संवाद, सामंजस्य आणि माणुसकीच्या बळावर तुटलेली नाती पुन्हा जोडता येतात, याचा आदर्श संदेश देणारी ठरली आहे. मालमत्तेपेक्षा नात्यांना अधिक महत्त्व देणाऱ्याबरहिणीच्या निर्णयाचे आणि समेट घडवून आणणाऱ्या सरपंच नासेर पटेल व सहकाऱ्यांच्या प्रयत्नांचे सर्वत्र कौतुक होत आहे. भावनांनी ओथंबलेला समेटाचा क्षण समेटाच्या वेळी उपस्थित प्रत्येकाच्या डोळ्यांत अश्रू तरळले होते. तब्बल १७ वर्षांनंतर बहिणीने आपल्या भावाला मिठी मारत मनातील सर्व कटुता दूर केली.इतर भावंडांनीही एकमेकांना गळाभेट देत वर्षानुवर्षे साचलेल्या वेदना आणि दुरावा अश्रूंमधून व्यक्त केला.

**मालमत्तेपेक्षा नातं मोठं!**

न्यायालयाने मालमत्तेचा हक्क बहिणीच्या बाजूने दिला असतानाही तिने न्यायालयीन विजयापेक्षा भावाचे प्रेम आणि कौटुंबिक नात्याला अधिक महत्त्व देत ती मालमत्ता स्वखुशीने भावाच्या नावे परत केली. या निर्णयामुळे नारायणपूर परिसरात माणुसकीचा आणि कौटुंबिक ऐक्याचा अनोखा आदर्श निर्माण झाला आहे. मालमत्तेच्या वादामुळे नाती तुटत असताना या बहिणीने हक्काची जमीन सोडून प्रेम, विश्वास आणि नातेसंबंध जपण्याचा संदेश दिला. तिच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत असून, ''मालमत्तेपेक्षा नाती मोठी'' हा संदेश पुन्हा अधोरेखित झाला आहे.


**CHANGE IN NAME**

I Have changed my old name Sunil Ramchand Punjabi to new name as Sunil Rajchand punjabi Vide adhar no- 6176 6605 3763

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME AASHABAI SOMNATH DUBE (IN LEAVING CERTIFICATE) (BEFORE NAME) TO THE NEW NAME AS ASHA SAMBHAJI JAGTAP ( AADHAR No. 9006 9710 3926) FROM VIDE AFFADAVIT BEFORE NOTARY PUBLIC SANGAMNER PLACE – SANGAMNER DATE – 15/07/2026

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME ZAHEDA GULAM ALI (IN LEAVING CERTIFICATE) (BEFORE NAME) TO THE NEW NAME AS JAYADA FIROJ PATHAN ( AADHAR No. 9922 4583 5708) FROM VIDE AFFADAVIT BEFORE NOTARY PUBLIC KOLHAR PLACE – KOLHAR DATE – 15/07/2026


## निधन वार्ता

### यशोदा भनगडे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** महांकाळवाडगाव येथील येशोदा पांडुरंग भनगडे (वय ८०) यांचे निधन झाले. त्यांचे मागे पती,तीन मुले,नातवंडे असा परिवार आहे.भाजपा पंचायतराज ग्रामविकास जिल्हाध्यक्ष अनिल भनगडे यांची चुलती,विष्णू,कृष्णा,व संजय यांच्या मातोश्री,व पुरवठा अधिकारी बबन भनगडे यांच्या त्या आजी होत.

### रेवणनाथ महानोर



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव :** येथील रेवणनाथ किसन महानोर (वय ७०) यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन बहिणी,पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

### कचरू पेचे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा बुद्रुक येथील जुन्या पिढीतील प्रगतशील शेतकरी व माजी उपसरपंच कचरू सीताराम पेचे (वय ९९) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. पेचे यांच्या पश्चात दोन मुली,एक मुलगा,सूना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. शेतकरी संपतराव पेचे यांचे ते वडील तर माजी सरपंच अण्णाभाऊ पेचे यांचे ते चुलते होते.

### लक्ष्मणराव आव्हाड



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** पाथर्डी तालुक्यातील मजले चिंचोली येथील जुन्या पिढीतील शेतकरी लक्ष्मणराव बाबुराव आव्हाड (वय ९६) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. लक्ष्मणराव आव्हाड यांच्या पश्चात दोन मुले,सूना,नातवंडे पतवंडे असा परिवार आहे. भाजप ओबीसी मोर्चाचे राज्य उपाध्यक्ष सुधाकरराव आव्हाड व वसंतराव आव्हाड यांचे ते वडील तर इंजिनिअर प्रशांत आव्हाड यांचे ते आजोबा होते.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गुरुवार दि .१६ जुलै २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२०<br>३४६<br>३३७ | ३-९ | १३०<br>२७०<br>१२५ | ३२-६९-१५-०४-९८ |

**कल्याण**

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२९<br>४८०<br>६६० | २-७ | १२४<br>४६७<br>३४० | २६-०७-८१-९५-७६ |

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२६<br>४५०<br>१४४ | ९-२ | १५६<br>२४६<br>२२८ | ९०-५२-१६-३७-२८ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |

## द•ख•ल



### संत शेख महंमद महाराज दिंडी पंढरपूरकडे मार्गस्थ

**श्रीगोंदा :** हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक आणि वारकरी संप्रदायातील थोर संत संत शेख महंमद महाराज यांच्या पायी दिंडीचे पंढरपूरकडे उत्साहपूर्ण वातावरणात प्रस्थान झाले. टाळ-मृदुंगाच्या गजरात, ज्ञानोबा-तुकाराम आणि पुंडलिक वरदा हरी विठ्ठलच्या अखंड जयघोषाने परिसर भक्तिमय झाला. दिंडीत शेकडो वारकरी, महिला, युवक आणि ज्येष्ठ भाविक सहभागी झाले होते. भगव्या पताकेसह संत शेख महंमद महाराजांच्या परंपरेचे प्रतीक असलेला पांढरा ध्वजही दिंडीचे वैशिष्ट्य ठरला. मार्गातील विविध गावांमध्ये दिंडीचे स्वागत, पुष्पवृष्टी व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. संत शेख महंमद महाराजांनी समता, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या विचारांचा वारसा जपत ही दिंडी दरवर्षी श्रीगोंद्यातून पंढरपूरकडे प्रस्थान करते. आषाढी वारीच्या या पवित्र प्रवासातून सामाजिक ऐक्य आणि भक्तीची परंपरा अधिक दृढ होत असल्याची भावना वारकऱ्यांनी व्यक्त केली.

### खडकी ते पंढरपूर पायी दिंडीचे भक्तिमय व शिस्तबद्ध रवाना



**नगर तालुका :** आषाढी वारीच्या पावन पर्वानिमित्त खडकी येथून प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या श्री वैराग्यमूर्ती कैकाडी महाराज पायी दिंडी सोहळ्याचे मंगळवारी सकाळी श्री हनुमान मंदिरातून अत्यंत भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. विठ्ठलनामाच्या अखंड गजराने, टाळ-मृदंगाच्या निनादाने आणि ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. पहिल्याच वर्षी निघालेल्या या दिंडीला वारकरी, ग्रामस्थ आणि भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. भगव्या पताका फडकवत, अभंग गात आणि विठ्ठलभक्तीचा संदेश देत शेकडो वारकरी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाले. दिंडीतील शिस्त, एकोपा आणि भक्तिभावाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. प्रस्थानापूर्वी श्री हनुमान मंदिरात महापूजा, आरती, हरिनाम संकीर्तन व दिंडी पूजन करण्यात आले. मान्यवरांच्या शुभहस्ते दिंडीला प्रारंभ झाला. यावेळी वारकऱ्यांना विठ्ठलनामाचा अखंड जप करत वारीची परंपरा जपण्याचे आवाहन करण्यात आले.

### श्री रेणुका माता प्रतिष्ठानची पायी दिंडी पंढरपुरकडे



**अहिल्यानगर :** आषाढी एकादशीनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी पायी दिंडी सोहळ्यांच्या माध्यमातून पंढरपूरकडे प्रस्थान करत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर श्री रेणुका माता प्रतिष्ठान, नागापूर यांच्या पायी दिंडी सोहळ्याचे उत्साहात प्रस्थान झाले. दिंडीचे बोल्हेगाव ग्रामस्थांच्या वतीने मोठ्या भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. टाळ-मृदुंगाच्या गजरात, ज्ञानोबा-तुकाराम, माऊली आणि विठ्ठल-विठ्ठल या नामघोषांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. दिंडीतील वारकरी, भाविक आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतल्याने बोल्हेगाव परिसरात धार्मिक व आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले. यावेळी स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे, ह.भ.प. तुकाराम महाराज कातोरे, ह.भ.प. बाबा महाराज कातोरे, तेजस डुरकुले, अविनाश वाटमोडे, शंकर वाटमोडे, नवनाथ कोलते, पंकज वाकळे, रावसाहेब वाटमोडे, नगरसेविका आशाबाई कातोरे, नाथाभाऊ वाटमोडे, राहुल कराळे, सुरेश वाकळे, श्याम वाकळे, भाऊसाहेब वाकळे, मारुती वाटमोडे, प्रल्हाद कातोरे, लोभाजी कातोरे यांच्यासह वारकरी, भाविक व ग्रामस्थ उपस्थित होते.

### केडगावच्या भैरवनाथ पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान



**अहिल्यानगर :** आषाढी वारीनिमित्त केडगाव येथील श्री भैरवनाथ पायी दिंडीचे श्रीक्षेत्र पंढरपूरकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि विठ्ठल नामस्मरणात शेकडो वारकरी भाविकांनी उत्साहाने दिंडीत सहभाग घेतला. यावेळी उदयनराजे संदीप कोतकर यांनी सांगितले की, संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत परंपरेने समाजाला भक्ती, सेवा, समता आणि मानवतेचा मार्ग दाखविला आहे. पंढरपूरची वारी ही केवळ यात्रा नसून मन शुद्ध करणारी, समाजात बंधुभाव वाढविणारी आणि प्रत्येकाला अध्यात्माची अनुभूती देणारी पवित्र परंपरा आहे. श्री भैरवनाथ पायी दिंडीचे मार्गदर्शक भानुदास कोतकर, सुरेखा कोतकर, उद्योजक सचिन कोतकर, दिंडी चालक रामदास महाराज क्षीरसागर, मारुती महाराज जने, भागीनाथ बापू कोतकर, ईश्वर महाराज नवसुपे, भागवत महाराज सातपुते, भिमराज महाराज सातपुते यांच्यासह वारकरी बांधव, ग्रामस्थ, युवक आणि विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एसआयआर पुर्ननिरीक्षणाला ४५ दिवसांची मुदतवाढ द्या

## पीस फौंडेशनसह विविध सामाजिक संघटनांची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राज्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात सुरू असलेली विशेष सघन मतदार यादी पुनरीक्षण (डशिलळरश्र खपींशपीळींश ठर्शींळीळेप - डखठ) प्रक्रिया अद्याप पूर्णत्वास गेलेली नसल्याने या प्रक्रियेस किमान ४५ दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी पीस फाऊंडेशनसह विविध सामाजिक संघटनांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त यांना पाठविण्यात आले आहे.

सामाजिक संघटनांच्या शिष्टमंडळाने बुधवारी (१५ जुलै) प्रभारी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन या प्रक्रियेत नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष आर्किटेक्ट अर्शद शेख, भारतीय जनसंसदचे अशोक सब्बन, बबलू खोसला, विजय शिरसाठ, ड. विद्या शिंदे, एम. इकबाल, पीपल्स हेल्पलाईनचे वीरबहादूर प्रजापती, रईस शेख,



इम्तीयाज शेख, मोहसीन सय्यद, अलफैज सय्यद, अन्सार सय्यद आदी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, भारतीय लोकशाहीची खरी ताकद मुक्त, निष्पक्ष आणि सर्वसमावेशक निवडणूक प्रक्रियेत आहे. मतदार यादी ही या प्रक्रियेचा पाया असून प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव त्यात समाविष्ट असणे अत्यंत आवश्यक आहे. जर एखाद्या पात्र मतदाराचे नाव यादीतून वगळले गेले किंवा त्रुटी राहिल्या, तर त्याच्या घटनात्मक मतदानाच्या अधिकारावर थेट परिणाम होऊ शकतो. सध्या मतदार पुनरीक्षण प्रक्रियेदरम्यान अनेक नागरिकांना आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, त्यांची पडताळणी करून वेळेत अर्ज सादर करणे यात मोठ्या अडचणी येत आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिक, स्थलांतरित कामगार, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अधिक वेळेची गरज आहे.

# महापालिकेच्या ऑनलाईन प्रणालीतील अडचणी हटवा

## विविध मागण्यांसाठी ठेकेदार संघटनेची आयुक्त डांगे यांच्याशी चर्चा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेत नुकतीच सुरू करण्यात आलेल्या ऑनलाईन ई-एमबी प्रणालीमुळे ठेकेदारांना विविध तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत असून, कामकाजात मोठा विलंब होत आहे. या समस्यांसह अतिरिक्त जीएसटी, अनामत रक्कम आणि इतर प्रलंबित प्रश्नांबाबत अहिल्यानगर ठेकेदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी मांडण्यात आलेल्या सर्व मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत येत्या चार दिवसांत तातडीने तोडगा काढण्यात येईल, असे



आश्वासन आयुक्त डांगे यांनी दिले.

या बैठकीस आयुक्त यशवंत डांगे, शहर अभियंता मनोज पारखे, ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष सचिन लोटके, शोएब शेख, अनुज सोनीमंडलेचा, ओमकार देशमुख, अभिजित काळे, आनंद पुंड, राहुल पडोळे, दीपक कावळे, राहुल बोरूडे, नितीन फुलसौंदर, प्रसाद साळी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे महापालिकेतील ठेकेदारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर लवकरच मार्ग निघेल, अशी अपेक्षा ठेकेदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# मनपा कर्मचाऱ्यांचा कामाचा ताण कमी करा

## अतिरिक्त शासकीय कामे कमी न झाल्यास आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेतील कामगार व कर्मचाऱ्यांवर दिवसेंदिवस वाढत असलेल्या अतिरिक्त कामाच्या ताणामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती आता ऐरणीवर आली आहे. आरोग्य विभागातील कर्मचारी कै. राजेंद्र बबन फुलारी यांनी मानसिक तणावातून आत्महत्या केल्याच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनने तीव्र भूमिका घेत महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना सविस्तर निवेदन सादर केले आहे. कामगारांवरील अतिरिक्त शासकीय कामांचा बोजा तातडीने कमी करावा, अन्यथा बेमुदत तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर व सचिव आनंद वायकर यांनी दिला.

युनियनच्या निवेदनानुसार, सन २०१६ मध्ये शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार महानगरपालिकेत २,८७१ कामगार-कर्मचाऱ्यांची पदे मंजूर आहेत. मात्र दर महिन्याला २५ ते ३० कर्मचारी सेवानिवृत्त होत असल्याने सध्या केवळ सुमारे १,६०० कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून अत्यावश्यक सेवा चालविणे ही प्रशासनासाठी तारेवरची कसरत ठरत आहे. अशा परिस्थितीतही निवडणुका, जनगणना, एसआयआर अंतर्गत बीएलओची कामे, आपत्कालीन व्यवस्थापन, बोगस मतदार शोध मोहीम यांसारखी अतिरिक्त शासकीय कामे महानगरपालिका कर्मचाऱ्यांवर सोपविली जात असल्याने त्यांच्यावर प्रचंड मानसिक व शारीरिक ताण निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

महानगरपालिकेतील रस्ते, स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा, महसूल, कर वसुली यांसह सर्व सेवा अत्यावश्यक स्वरूपाच्या आहेत. मात्र कर्मचारी संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने दैनंदिन कामकाज करणेही कठीण झाले आहे. तरीदेखील जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत महानगरपालिका कर्मचाऱ्यांची विविध शासकीय कामांसाठी नियुक्ती केली जाते. त्यामुळे महापालिकेच्या नियमित कामकाजावर गंभीर परिणाम होत असल्याचा आरोप युनियनने केला आहे.

## भिंगारमध्ये किराणा दुकानातून रोकड पळविली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** भिंगार शहरातील यशवंत नगर डेअरी फार्म परिसरामध्ये एका किराणा दुकानातून चोरट्याने १२ हजार ८३० रुपये रोख रक्कम चोरून नेल्याची घटना १३ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी संशयित आरोपी इरफान पप्पू पटेल (रा. यशवंत नगर, डेरी फार्म, भिंगार) याच्याविरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मीनल दिवाकर घाटविसावे (रा. केकती,शहापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. याबाबत माहिती अशी की, घाटविसावे यांचे यशवंत नगर डेअरी फार्म येथील सागर हाईट्स इमारतीमध्ये किराणा मालाचे दुकान आहे. दि. १३ जुलै रोजी आरोपी इरफान पप्पू पटेल यांनी त्यांच्या दुकानातील एकूण १२ हजार ८३० रुपये रोख रक्कम चोरून नेली. याबाबत भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात इरफान पप्पू पटेल यांच्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा अधिक कपास पोलीस उपनिरीक्षक अकोलकर हे करीत आहेत.

## पूर्ववैमनस्यातुन शेंडी गावात बापलेकावर जीवघेणा हल्ला : चौघाजणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शेंडी गावातील शिंदेवस्ती रस्त्यावर जुन्या वादातून एका चालकाला आणि त्याच्या मुलाला चार जणांनी मिळून बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अण्णासाहेब निवृत्ती कराड ( रा. शिंदेवस्ती रोड, शेंडी, अहिल्यानगर) हे आपल्या मुलासह परिसरात असताना जुन्या भांडणाच्या कारणावरून संशयित आरोपी अशोक अजिनाथ खेडकर व भाऊसाहेब शंकर खेडकर (दोघे रा. मालेवाडी, पोस्ट खरवंडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) यांच्यासह इतर दोन अनोळखी व्यक्ती एका चारचाकी वाहनातून (क्र. एमएच १२ डब्ल्यूएक्स ४९०५) घटनास्थळी आले. आरोपींनी गाडीतून उतरताच अण्णासाहेब व त्यांच्या मुलाला अश्लील भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर संशयित आरोपी अशोक खेडकर याने आपल्या हातातील लाकडी दांडक्याने फिर्यादीच्या मुलावर हल्ला करून त्याला जबर मारहाण केली.

हा वाद सोडवण्यासाठी आणि मुलाला वाचवण्यासाठी फिर्यादी अण्णासाहेब कराड मध्ये पडले असता चौघा जणांनी त्यांनाही लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच या परिसरात पुन्हा दिसल्यास जीवे मारण्याची धमकी देऊन आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. या जीवघेण्या हल्ल्यानंतर पीडित अण्णासाहेब कराड यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपी अशोक खेडकर, भाऊसाहेब खेडकर आणि इतर दोन अज्ञात व्यक्तींविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहा. पो. नि. थोरात करत आहेत.

## डॉ. मंदार बिडवे यांना पी.एच.डी.

**अहिल्यानगर :** डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, अहिल्यानगर येथील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातील



प्राध्यापक प्रा. डॉ. मंदार मारुती बिडवे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी यांत्रिकी अभियांत्रिकी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या विषयावर त्यांनी केलेल्या संशोधनाला शैक्षणिक तसेच औद्योगिक क्षेत्रातून विशेष दाद मिळत आहे. डॉ. बिडवे यांच्या संशोधनाचा विषय प्रॉडक्ट लाईफ सायकल नालिसिस अँड असेसमेंट ऑफ लिथियम-आयन बॅटरी फॉर प्रायॉरिटायझिंग द फॅक्टर्स ऑफ इफेक्टिव्ह फाइव्ह आर असा असून, हे संशोधन त्यांनी प्रा. डॉ. स्वानंद कुलकर्णी, एस. के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे. पीएच.डी. संशोधनादरम्यान त्यांनी तीन आंतरराष्ट्रीय संशोधन निबंध प्रकाशित केले. त्यापैकी दोन निबंध स्कोपस-इंडेक्स्ड नियतकालिकांमध्ये, तर एक संशोधन निबंध एससीआय-इंडेक्स्ड 'जर्नल ऑफ एनर्जी स्टोरेज' या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रतिष्ठित नियतकालिकात प्रसिद्ध झाला आहे.

## वारूळवाडीत वृद्ध महिलेला मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शेतातील बांधावरील बोरीचे झाड तोडण्यास विरोध केल्याने एका ६० वर्षीय वृद्ध महिलेला लाथा बुक्क्यांनी व प्लास्टिकच्या पाईपने बेदम मारहाण केल्याची घटना नगर तालुक्यातील वारूळवाडी येथे दि. १३ जुलै रोजी दुपारी घडली. या मारहाणीत वृद्ध महिलेच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून तिच्या गळ्यातील सोन्याचे दागिने गहाळ झाले आहेत. याबाबत भिमाबाई सुभाष वारुळे (रा. वारूळवाडी, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, फिर्यादी महिला व आरोपी यांच्या सामायिक शेतात बांधावर असलेले बोरीचे झाड तोडण्याचे काम सुरू होते. हे झाड तोडण्यास वृद्ध महिलेने विरोध केला. याचा राग मनात धरून चौघा आरोपींनी वृद्ध महिलेला शिवीगळ करत लाथा बुक्क्यांनी मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. तर एका महिला आरोपीने वृद्ध महिलेच्या डोक्यात प्लास्टिकच्या पाईप मारून तिला गंभीर जखमी केले. या झटपटीत वृद्धीच्या गळ्यातील पाच ग्रॅम सोन्याचे डोरले शेतात कुठेतरी पडून गहाळ झाले. या घटनेत जखमी झालेल्या वृद्ध महिलेला उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## महिला बचत गटांना २५ लाखांचे कर्ज वाटप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने वाघुंडे बुद्रुक येथे आयोजित कार्यक्रमात ९ महिला बचत गटांना एकूण २५ लाख रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले. हे कर्ज सोशल सेंटर व नाबार्ड यांच्या माध्यमातून मिळाले बँक ऑफ महाराष्ट्राने कर्ज दिले आहे या कर्जाला २५% टक्के सबसिडी मिळाली आहे. या उपक्रमामुळे गावातील महिलांना स्वावलंबी होण्यासाठी तसेच विविध लघुउद्योग व व्यवसाय सुरू करण्यासाठी मोठे आर्थिक बळ मिळाले आहे.

महिला बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक प्रगती साधण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने कार्यरत असलेल्या राजेश्वरी कोठावळे-दिवटे यांनी या कर्जप्रकरणी विशेष पाठपुरावा केला. तब्बल दहा वर्षांपासून महिला सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या राजेश्वरी कोठावळे-दिवटे यांच्या प्रयत्नांमुळे विविध



बचत गटांना बँकांकडून कर्ज मंजूर होऊन त्याचे वितरण शक्य झाले. त्यांच्या या कार्याबद्दल महिलांनी विशेष कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमात अष्टविनायक, गणराज, समर्थ, सावता माळी, स्वामिनी, श्री स्वामी समर्थ, राधाराणी, शिव पार्वती आणि क्रांती ज्योती या महिला बचत गटांना कर्जाचे वाटप करण्यात आले. या कर्जाच्या माध्यमातून महिलांना किरकोळ व्यवसाय, दुग्धव्यवसाय, शेतीपूरक उद्योग, गृहउद्योग तसेच इतर उत्पन्नवाढीच्या उपक्रमांना चालना देण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

# माजी खा. विखेंनी दुध भेसळखोरांना चिथावणी देऊ नये : ॲड. लगड

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** संपूर्ण महाराष्ट्रात दुध भेसळखोरांना वठणीवर आणण्याचे काम राज्यातील एक कर्तव्यदक्ष अधिकारी तुकाराम मुंढे करत असताना, त्या कामात खो घालण्याचे काम विखेच काय कुठल्याही पुढाऱ्याने करू नये. अशी मागणी सामाजिक प्रश्नावर सतत आवाज ऊठविणारे जिल्ह्यातील जेष्ठ विधीज्ञ ड सुरेश लगड यांनी प्रसिद्धी पत्रकांद्वारे केली आहे.

ड .सुरेश लगड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, तुकाराम मुंढे या अधिकाऱ्याच्या कामाला एवढी प्रसिद्धी का ड्यापूर्वीच्या अधिकाऱ्यांनीही काम केलेले



आहे.असा प्रश्न विखे यांनी उपस्थित केला आहे. यावर विखेंनी खुलासा करावा. जर यापूर्वी कुठल्याही अधिकाऱ्यांनी तुकाराम मुंढे यांचेसारखे काम केले असते तर त्याचा गवगवा झाला असता. व जनतेने पूर्वीच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या चांगले कामाबद्दल डोक्यावर घेतले असते. परंतु वस्तुस्थिती तशी दिसत नाही. चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्याला शाबासकीची थाप दिली पाहिजे. चांगल्याला चांगले म्हणण्याची दानत ठेवली पाहिजे. संपूर्ण महाराष्ट्रात या अधिकाऱ्याला जनतेने त्यांच्या चांगल्या कामाने डोक्यावर घेतलेले असताना चुकीचे पध्दतीने कार्यक्षम अधिकाऱ्याला दोष देणे उचीत नाही. तुकाराम मुंढे यांनी कोणत्या अधिकाऱ्यावर दबाव टाकून खोटे पंचनामे करण्यास सांगितले? याचा सविस्तर खुलासा करावा.तसे असेल तर तुम्ही माननीय मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे रितसर तक्रार करावी.आपण तर भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष आहात. एवढच नव्हे तर आपण भाजपचे माजी खासदार आहात. आपण शिक्षीत आहात. आपण विचारपुर्वक



बोलले पाहिजे. आपले संपूर्ण कुटुंब भारतीय जनता पक्षाचे सर्वेसर्वा आहेत. आपले पिताश्री देखील कॅबिनेट मंत्री व जिल्हयाचे पालकमंत्री आहे. उलट दुध उत्पादक शेतकऱ्यांना जादा दर कसा मिळेल यासाठी प्रयत्न केले तर आपणास सर्व दुध उत्पादक धन्यवाद देतील. असेही ॲड. सुरेश लगड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## केस मागे घेण्यासाठी महिलेला जिवे मारण्याची धमकी : गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील धरती चौक परिसरातील महाराणी गल्लीत भावाने दाखल केलेली केस मागे घेण्यासाठी एका महिलेचा विनयभंग करून तिला व तिच्या भावाला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. १४ जुलै रोजी सायंकाळी ७.३० वा.च्या सुमारास घडली.

याबाबत माहिती अशी की , पीडित महिला आपल्या घरी असताना आरोपी विकार शब्बीर सय्यद (रा. महाराणी गल्ली, धरती चौक ) यांनी तिच्या घरात प्रवेश केला. त्यांनी पिडीतेच्या भावाला पोलीस ठाण्यात दिलेली केस मागे घेण्याचा तगादा लावला. महिलेने या गोष्टीला नकार दिला असता आरोपींने तिला अश्लील भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपीने महिलेचा हात धरून तिला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. एवढ्यावरच न थांबता जर केस मागे घेतली नाही तर तुला आणि तुझ्या भावाला जीवे मारून टाकू अशी धमकी दिली. याबाबत महिलेच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी आरोपी विकार शब्बीर सय्यद याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# नीरा नदीकाठी भक्तीचा महासागर

## संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांचे शाहीस्नान उत्साहात



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** संत ज्ञानेश्वर माऊलींच्या आषाढी पालखी सोहळ्यातील अत्यंत भावपूर्ण आणि आकर्षणाचा केंद्रबिंदू असलेला शाहीस्नान सोहळा आज पुरंदर तालुक्यातील नीरा नदीच्या पवित्र तीरावर भक्तिमय वातावरणात पार पडला. दुपारच्या विसाव्यानंतर दुपारी एक वाजता माऊलींचा सोहळा नीरा स्नानासाठी मार्गस्थ झाला. यावेळी नीरा नदीवरील जुन्या ब्रिटिशकालीन पुलावरून जात असलेल्या पालखी सोहळ्याचे विहंगम दृश्य पाहण्यासाठी वारकरी आणि भाविकांनी मोठी गर्दी केली होती.माऊली... माऊली... च्या अखंड जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

सोहळामालक राजाभाऊ आरफळकर यांनी संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुका घेऊन हरीनामाच्या गजरात नीरा नदीवरील दत्त घाटावर आणल्या. पादुकांच्या दर्शनासाठी आणि शाहीस्नानाचा ऐतिहासिक क्षण अनुभवण्यासाठी घाट परिसर भाविकांनी फुलून गेला होता. मंगलमय वातावरणात संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांना नीरा नदीत विधिवत स्नान घालण्यात आले. या वेळी उपस्थित वारकरी आणि भाविकांनी भक्तिभावाने नामस्मरण करत हा पवित्र सोहळा अनुभवला. शाहीस्नान सोहळ्यास प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, सोहळा प्रमुख ड. राजेंद्र उमाप, विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे, सोहळामालक ऋषीकेश पवार, मानकरी राहुल चिताळकर, साहील कुऱ्हाडे, योगेश आरू तसेच व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर उपस्थित होते. नीरा नदीचा घाट आणि परिसर भाविकांनी तुडुंब भरून गेला होता. माऊलींच्या पादुकांचे शाहीस्नान आणि पुलावरून मार्गक्रमण करणाऱ्या पालखी सोहळ्याचे विहंगम दृश्य आपल्या डोळ्यांत साठवण्यासाठी हजारो वारकरी आणि माऊलीभक्तांनी मोठी गर्दी केली. भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा संगम अनुभवायला मिळालेला हा सोहळा आषाढी वारीतील अविस्मरणीय पर्वणी ठरला.

# कुमशेत येथे कायदेविषयक जनजागृती शिबिर उत्साहात संपन्न




प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** तालुका विधी सेवा समिती, जुन्नर जि. पुणे यांच्या वतीने आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या वार्षिक कार्यक्रम पत्रिकेनुसार १५ जुलै रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुमशेत येथे कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. सकाळी ९.३० ते १०.३० या वेळेत झालेल्या या शिबिराचे मार्गदर्शक जिल्हा न्यायाधीश-१ तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष एस. बी. शेलार होते. शिबिराचे अध्यक्षस्थान जिल्हा न्यायाधीश जुन्नर आर. जी. कुंभार यांनी भूषवले.

यावेळी बोलताना कुंभार यांनी नागरिकांनी कायद्याचे पालन करावे. गावातील तंटे-भांडणे गावपातळीवरच मिटवण्यासाठी प्रयत्न करावेत असे प्रतिपादन केले. शिबिरात विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

वकिलांनी दिले मार्गदर्शन - वकील राम कर्पे यांनी आदिवासी समुदायाचे हक्क, सरकारी कल्याणकारी योजना आणि मोफत कायदेशीर मदत व सेवा याबाबत माहिती दिली. - वकील यु. सी. तांबे यांनी मानसिक आजार व बौद्धिक अक्षमता असलेल्या व्यक्तींसाठी कायदेशीर सेवा योजना २०२४ स्पष्ट केली. - वकील विश्वनाथ चव्हाण यांनी नागरिकांची मुलभूत कर्तव्ये सांगितली. - वकील अविनाश थोरवे यांनी पोक्सो कायद्याबद्दल जनजागृती केली. - ॲड. अरुण गाडेकर यांनी नालसाच्या राष्ट्रीय विधी सहाय्य हेल्पलाईन आणि पोर्टलची माहिती दिली. या शिबिराला जुन्नर तालुका वकील बार असोसिएशनचे उपाध्यक्ष, वकील निलीमा शेरकर, शिवम नायकोडी, कर्मेश गाडेकर, तालुका विधी सेवा समिती समन्वयक प्रशांत मोरतळे, कुमशेतचे सरपंच रवींद्र डोके, माजी सरपंच अंबादास डोके, तसेच शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिबिराची प्रस्तावना शाळेतील शिक्षक यश घोडे यांनी केली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्याम लोलापोड यांनी केले तर आभार प्रदर्शन सरपंच रवींद्र डोके यांनी मानले. ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये कायदेशीर हक्क आणि कर्तव्यांबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने झालेले हे शिबिर मोठ्या उत्साहात यशस्वीरित्या पार पडले, अशी माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष एस. बी. शेलार यांनी दिली.

# स्वर्गीय अजितदादा पवार यांची जयंती अधिकृतपणे साजरी होणार

## शासकीय कार्यक्रमांच्या यादीत समावेश




प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** राज्य शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्याचे नेते स्वर्गीय अजितदादा अनंतराव पवार यांच्या जयंतीचा समावेश सन २०२६ मधील राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या अधिकृत जयंती कार्यक्रमांमध्ये केला आहे.

दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ आणि ज्येष्ठ नेते आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती आणि (दि:१५) रोजी तात्काळ सामान्य प्रशासन विभागाने १५ जुलै, २०२६ रोजी या संदर्भातील अधिकृत परिपत्रक जारी केले असून अजितदादांच्या लोकसेवेचा आणि महाराष्ट्राच्या विकासातील त्यांच्या योगदानाचा राज्य शासनाकडून गौरव करण्यात आला आहे.

परिपत्रकात दिलेल्या माहितीनुसार, स्वर्गीय अजितदादा पवार यांची जयंती २२ जुलै, २०२६ (बुधवार) रोजी राज्यभरात साजरी केली जाणार आहे. या दिवशी मंत्रालयासह राज्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये दादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले जाणार आहे.याशिवाय सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्येही जयंती साजरी होणार आहे.विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना आपापल्या भागातील सर्व यंत्रणांमध्ये या कार्यक्रमाचे योग्य नियोजन आणि अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

स्वर्गीय अजितदादांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत प्रशासनावर ठेवलेली मजबूत पकड, पायाभूत सुविधांचा विकास आणि लोककल्याणकारी योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी घेतलेले परिश्रम यामुळे त्यांना जनमानसात हक्काचे 'दादा' म्हणून स्थान मिळाले. शासनाचा हा निर्णय म्हणजे त्यांनी महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी दिलेल्या अभूतपूर्व योगदानाला आणि त्यांच्या अविरत कार्यपद्धतीला दिलेली ही एक मोठी आदरांजली मानली जात आहे.यामुळे आता दरवर्षी २२ जुलै रोजी शासकीय स्तरावर दादांच्या लोकसेवेचा वारसा अधिकृतपणे आठवला जाणार आहे

# पुणे जिल्ह्यातील ज्ञात-अज्ञात पर्यटन स्थळांची माहिती पाठविण्याचे आवाहन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुणे जिल्हा हा ऐतिहासिक, धार्मिक, नैसर्गिक तसेच सांस्कृतिक वारसा लाभलेला असून देश-विदेशातील पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. जिल्ह्यातील पारंपरिक पर्यटन स्थळांबरोबरच अलीकडील काळात विकसित झालेल्या निसर्गरम्य, साहसी, ग्रामीण आणि पर्यावरणपूरक पर्यटन स्थळांची प्रसिद्धी व प्रचार करण्यासाठी नागरिक, पर्यटनप्रेमी, अभ्यासक आणि संबंधित संस्थांनी सहकार्य करावे,त्यांच्याकडे असलेली माहिती पाठवावी असे आवाहन पर्यटन संचालनालयाच्या प्रादेशिक उपसंचालक कार्यालयाने केले आहे.

पुणे जिल्ह्यातील ज्ञात-अज्ञात पर्यटन स्थळांची ऐतिहासिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक माहिती, संदर्भ, छायाचित्रे, नकाशे, दस्तऐवज, पर्यटन स्थळांची वैशिष्ट्ये, तेथे पोहोचण्याचे मार्ग, उपलब्ध सुविधा, स्थानिक संस्कृती तसेच पर्यटनासाठी योग्य कालावधी आदी माहिती पर्यटन संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, पुणे-१ यांच्याकडे पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित माहिती ddtourism. pune-mhgov.in ¶m B©-मेलवर किंवा ९५११८७४००८ / ८२७५३८७०३२ या व्हॉट्सअप क्रमांकावर पाठविता येईल.



# शाळेतूनच घडते नेतृत्व व चारित्र्यनिर्मिती : डॉ.पठारे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**वाघोली :** भारतीय जैन संघटना (बीजेएस) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात अकरावीच्या नवागत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न झाला. लेझीम पथक, ढोल-ताशांच्या गजरात आणि गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात नोबेल हॉस्पिटल, हडपसरचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजय पठारे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉईंटचे उद्घाटन करण्यात आले. बारावीच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करून वातावरण उत्साही केले.उपप्राचार्य पोपटराव गेठे यांनी प्रास्ताविकातून विद्यालयाची शैक्षणिक परंपरा, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विविध उपक्रमांची माहिती दिली. त्यानंतर प्राचार्य संतोष भंडारी यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे डॉ. संजय पठारे यांचा शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी अकरावीमध्ये प्रवेश घेतलेल्या कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील प्रत्येकी एका विद्यार्थ्याचा तसेच बारावी परीक्षेत तिन्ही शाखांतील प्रथम तीन क्रमांक प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. पुरस्कार वितरणाचे वाचन शिक्षिका प्रतिभा ढोकरे यांनी केले.विद्यालयातील विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांनी पोस्टर रॅलीच्या माध्यमातून सादर केली. विद्यालयाची माजी विद्यार्थिनी व बारावी विज्ञान शाखेतील गुणवंत मयुरी खाडे हिने यशाचा प्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडला. माजी विद्यार्थी आर्यन लोणकर, अभिषेक माने तसेच विद्यार्थीनी सिद्धी शिर्के आणि विद्यार्थी मयूर शेटे यांनीही मनोगत व्यक्त केले.शिक्षिका राणी कळमकर यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. ज्येष्ठ शिक्षक व शिस्त विभागप्रमुख डॉ. विष्णू देवडकर यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, जबाबदारी, आरोग्य आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व पटवून दिले.प्रमुख पाहुणे तथा नोबेल हॉस्पिटल, हडपसरचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजय पठारे यांनी मार्गदर्शन करताना, ध्येय निश्चित झाले की प्रेरणा निर्माण होते. गुगल माहिती देऊ शकते; मात्र नेतृत्व, जबाबदारी, सहकार्य भावना, संवादकौशल्य आणि चारित्र्यनिर्मिती शाळा-कॉलेजमधील शिक्षणातूनच घडते, असे सांगितले.

## दखल

# मॉडेल स्कूल उपक्रमात जारकरवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची निवड



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** .पुणे जिल्हा परिषदेच्या 'मॉडेल स्कूल' उपक्रमांतर्गत आंबेगाव तालुक्यातील जारकरवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची निवड करण्यात आली आहे. माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, पंचायत समिती सदस्या अंकिता वाळुंज यांच्या प्रयत्नांमधून ही निवड झाली. ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा उंचावणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.या योजनेत शाळेला शहरातील खासगी इंग्रजी शाळांप्रमाणे स्मार्ट वर्ग, डिजिटल सुविधा, क्रीडांगण आणि इतर आधुनिक सोयी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. आज जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी शाळेला भेट देऊन पाहणी केली. यावेळी पं.स. सदस्या अंकितााताई वाळुंज, सोसायटी चेअरमन खंडू भोजने, माजी उपसरपंच कौसल्या भोजने, शरद पतसंस्थेचे उपाध्यक्ष रवींद्र काकडे, शालेय समिती अध्यक्ष किरण लबडे केंद्र प्रमुख काळे सर, मुख्यध्यापक शिवाजी चासकर सर, आनंदा भोजने, दत्तात्रय लोले व सहशिक्षक यावेळी उपस्थित होते जारकरवाडी परिसरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण घराजवळच मिळणार असून पालकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# पिंपळे खालसात एकाच ठिकाणी बारा घोणस साप



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे :** पिंपळे खालचा (ता. शिरूर) येथे एकाच ठिकाणी अति विषारी घोणस जातीच्या सापाची बारा पिल्ले आढळून आल्याने खळबळ उडाली असून सर्पमित्रांच्या माध्यमातून सदर पिलांना पकडून निसर्गाच्या सानिध्यात सोडून देण्यात आले आहे. पिंपळे खालचा (ता. शिरूर) येथील श्रीकांत धुमाळ यांना त्यांच्या घराच्या बाजूला चार घोणस सापाची पिल्ले दिसून आली त्यांनी याबाबतची माहिती सर्पमित्रांना दिली, त्यानंतर निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख, नेचर कार्ड ऑर्गनायझेशन संस्थेचे अध्यक्ष गणेश टिळेकर, वन्य पशु पक्षी संरक्षण सामाजिक संस्थेचे तालुकाध्यक्ष श्रीकांत भाडळे यांनी सदर ठिकाणी जात पाहणी केली असता, घराच्या बाजूला असलेल्या अडोशाला काही घोणस सापाची पिल्ले दिसून आली, दरम्यान सर्पमित्रांनी श्रीकांत धुमाळ, रवींद्र धुमाळ, चांगुना धुमाळ, संगीता धुमाळ यांच्या उपस्थितीत सापांच्या पिल्लांना सुरक्षितपणे पकडले त्यावेळी घोणस या अतिविषारी सापाची तब्बल बारा पिल्ले सर्पमित्रांनी पकडून त्याबाबतची माहिती शिरूर वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे, नियतक्षेत्र वनअधिकारी सोपान अनासूने यांना देत सापाच्या सर्व पिल्लांना सुरक्षितपणे निसर्गाच्या सानिध्यात सोडून दिले आहे.

# वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**वळती :** वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून सामाजिक बांधिलकी जपत गोरक्ष इंदोरे यांनी वळती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भोकरवस्ती येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप केले. तसेच शाळेच्या शैक्षणिक प्रगतीसाठी एक संगणक संच भेट देण्यात आला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम, तालुकाध्यक्ष धोंडीभाऊ भोर, खरेदी-विक्री संघाचे संचालक बाळासाहेब बोऱ्हाडे, पंचायत समिती गणाचे अध्यक्ष बारकू बेनके, माजी उपसरपंच गोविंद गांजवे, तंटामुक्ती अध्यक्ष चंद्रकांत भोर, संपत भोर, निलेश भोर, बाबाजी भोर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका स्नेहल लोखंडे तसेच अंगणवाडीच्या शिक्षिका, मदतनीस, विद्यार्थ्यांचे पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी गोरक्ष इंदोरे यांच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत वाढदिवसासारखे वैयक्तिक आनंदाचे क्षण समाजोपयोगी कार्यातून साजरे करण्याचा संदेश दिला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन शालेय साहित्य वाटप व संगणक संच भेट देण्याच्या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक बाळासाहेब इंदोरे यांनी केले.

# शिवाजी महामुनी यांचे निधन



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** वनपुरी ( ता. पुरंदर ) येथील रहिवासी आणि सामाजिक कार्यकर्ते शिवाजी नारायण महामुनी यांचे नुकतेच आकस्मिक निधन झाले. त्यांचे वय ५३ वर्षांचे होते. सुतार व्यावसायिक म्हणून ते सर्वत्र परिचित होते. त्यांच्या पाठीमागे आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, तीन भाऊ, दोन बहिणी, चुलते, पुतणे, भाचे, चुलत भाऊ, चुलत बहिणी असा मोठा परिवार आहे. मांडवी (ता हवेली) येथील डॉक्टर प्रकाश महामुनी, माजी ग्रामपंचायत सदस्य आणि पत्रकार संभाजी महामुनी तसेच सामाजिक कार्यकर्ते तानाजी महामुनी यांचे ते बंधू होत.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे पती दिलीप रघुनाथ जाधव यांचे दि. ०८/०७/२०२४ रोजी निधन झाले. त्याचे नावे पिंपरी-चिंचवड आर.टी.ओ. मध्ये खालील तीन गाड्यांची नोंद आहे. (१) फोर व्हिलर Maruti Suzuki India Ltd. कंपनीचे Maruti Celerio VXI गाडी क्र. MH14 FG 9183 **चॅसीस क्र.** MA3ETDE1S00274817 **इंजिन क्र** K10BN1921859 कलर MG Grey, (२) टु व्हिलर TVS Motor Co. Ltd. कंपनीचे TVS JUPITER ZX गाडी क्र. MH14 LM 6998 **चॅसीस क्र.** MD626CG56R1C31630 **इंजिन क्र** DG5CR1818814 कलर STARLIGHT BLUE, (३) टु व्हिलर Suzuki Motorcycle I. Pvt. Ltd. कंपनीचे GIXXER 150CC गाडी क्र. MH14 FW 0448 **चॅसीस क्र.** MB8NO4BAAF8127523 **इंजिन क्र** BGA1128197 कलर Black, असा आहे. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे नावे कायदेशीर वारस म्हणून मी माझ्या नावे सदर वाहन हस्तांतर करण्यास उप-प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड कार्यालय यांच्याकडे कागदपत्रे सादर करीत आहे. सदर वाहना संदर्भात जर कोणाचीही कसलीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे आत लेखी स्वरुपात कळवावे. अन्यथा आपल्यापैकी कोणाचीही कसलीही तक्रार नाही, असे गृहीत धरून सदर वाहन मी माझ्या नावे हस्तांतर करून घेत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

**श्रीमती मंगल दिलीप जाधव** पत्ता : बी-५, दुसरा मजला, अनामिका अपार्टमेंट, शिवाजी उदय मंडळ समोर, चिंचवड, पुणे-३३.मो.९७६७८४७८७३

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझी पत्नी **मृणाल अनिरुध्द पिसाळ** यांचे दि. २०/०४/२०२५ रोजी निधन झाले. त्याचे नावे पिंपरी-चिंचवड आर.टी.ओ. मध्ये खालील तीन गाड्यांची नोंद आहे. (१) फोर व्हिलर Tata Motors Passenger Vehicles Ltd. कंपनीचे Punch Adv. 1.2 CNG B56 PH2 गाडी क्र. Mh14 LJ 1958 **चॅसीस क्र.** MAT867006RPB27495 **इंजिन क्र** REVTRN16BVXM28728 कलर Daytona Grey, (२) टु व्हिलर Honda कंपनीचे ACTIVA 3G गाडी क्र. MH14 FB 5707 **चॅसीस क्र.** ME4JF504HF8223692 **इंजिन क्र** JF50E82223383 कलर P A WHITE, (३) टु व्हिलर HERO कंपनीचे MAESTRO DELUXE गाडी क्र. Mh14 ED 2475 **चॅसीस क्र.** MBLJF32ABDGK28564 **इंजिन क्र** JF32AADGK28570 कलर HMATADSSDX, असा आहे. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे नावे कायदेशीर वारस म्हणून मी माझ्या नावे सदर वाहन हस्तांतर करण्यास उप-प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड कार्यालय यांच्याकडे कागदपत्रे सादर करीत आहे. सदर वाहना संदर्भात जर कोणाचीही कसलीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे आत लेखी स्वरुपात कळवावे. अन्यथा आपल्यापैकी कोणाचीही कसलीही तक्रार नाही, असे गृहीत धरून सदर वाहन मी माझ्या नावे हस्तांतर करून घेत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

**श्री.अनिरुध्द यशवंत पिसाळ** पत्ता : १७१/८, चिंचवड स्टेशन रोड, हिंदुस्तान बेकरी मागे, चिंचवड, पुणे-४११ ०३३.मो.९४२२०८२०४१

## श्री. नरसिंह नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

रांजणी, ता.आंबेगाव, जि. पुणे

### स्थावर मालमत्ता जाहीर फेर लिलाव

ज्या अर्थी,महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६०(१) कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम क्रमांक १०७ व त्या खालील उपनियमान्वये ज्या अर्थी, श्री. नरसिंह नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, रांजणी, ता.आंबेगाव, जि.पुणे या पतसंस्थेने खालील कर्जदाराचे विरुद्ध महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६०(१) अन्वये वसुली दाखले मिळविले आहेत.

**लिलाव फेर जाहीरनामा**

ज्या अर्थी,सदर जप्ती आदेशात नमुद केल्याप्रमाणे ऋणको यांनी मुदतीत रक्कम भरणा करण्यात कसूर केली आहे. त्या अर्थी,श्री.आर.बी.वाघ,मा.विशेष वसुली अधिकारी द्वारा श्री. नरसिंह नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, रांजणी, ता. आंबेगाव जि.पुणे असे जाहीर करतो कि, खालील कर्जदाराच्या जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा रीतसर जाहीर लिलाव खाली दर्शविलेल्या तारखेला ठेवण्यात आलेला आहे.लिलावाच्या अटी व शर्ती पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयास या सबंधित शाखेत बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.याशिवाय लिलावाच्या दिनांकास लिलावपूर्वी वाचून दाखविण्यात येतील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| अ.क्र | कर्जदाराचे नाव व वसुली क्रमांक व दिनांक | लिलावा अंतर्गत मालमत्तेचे वर्णन, लिलावाचे ठिकाण, तारीख व वेळ |
|---|---|---|
| १. | गुरुदत्त बॅटरी सर्व्हिसेस प्रो. प्रा. रुपाली शांताराम खुटाळ रा.मु.पो.मंचर,ता.आंबेगाव, जि. पुणे १०१/९५/२०२३ दिनांक- ३१/०५/२०२३ **जामीनदार :** १. श्री.नंदकुमार धोंडीबा बेंडे २. श्री. संतोष मारुती औटी | मौजे. मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील नगरपंचायत हद्दीतील वार्ड क्र.०४ मिळकत नं.४१९८ /६०५, विघ्नहर मंगल कार्यालय, स.नं. २९/१ या ईमारतीमधील गाळा क्र. १७, पूर्व- पश्चिम २२.४, दक्षिण- उत्तर १३ या मापाचा आर. सी. सी. एकुण २९१.५ चौ. फुट, लिलाव - मंगळवार, दिनांक- २८/०७/ २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता संस्था मुख्य कार्यालय रांजणी |

सदरचा जाहीरनामा आज **वार शुक्रवार, दिनांक १०/०७/२०२६ रोजी** माझे सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध करण्यात आला. टिप - लिलावात भाग घेऊ इच्छीनाऱ्या व्यक्तींनी पतसंस्थेशी संपर्क साधावा.

जा.क्र.वि.वि.अ/वसुली/ स्थावर/६५/२०२६-२०२७
विशेष वसुली अधिकारी पुणे
दिनांक : १०/०७/२०२६

**श्री आर. बी. वाघ**
विशेष वसुली अधिकारी
(महाराष्ट्र सह.संस्था अधिनियम)
१९६० व नियम १९६१ कलम १५६ (१) व नियम १०७ अन्वये

## श्री. नरसिंह नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

रांजणी, ता.आंबेगाव, जि. पुणे

### स्थावर मालमत्ता ताबा नोटीस (नमुना झेड)

ज्या अर्थी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० (१) प्रमाणे श्री. नरसिंह नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,रांजणी, ता. आंबेगाव, जि. पुणे यांनी मा. उपनिबंधक / मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्या आदेशान्वये खालील थकबाकीदार यांचेकडून असणारे कर्ज वसुली करिता लवादि दाखले प्राप्त केलेले आहेत. त्या अर्थी महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व १९६१ चा नियम १०७ (११) (ड-१) प्रमाणे श्री. आर. बी. वाघ विशेष वसुली अधिकारी पुणे आदेश जा.क्र-HO/ वसुली/ ६७/२०२६ दिनांक. १०/०७/२०२६ खालील थकबाकीदार यांची निम्नलिखित स्थावर मालमत्ता या नोटीशिन्वये ताबा घेतला आहे. आणि नोटिशीच्या तारखेनंतर सदर स्थावर मालमत्ता तबदील केल्यास, कोणतेही खाजगी हस्तांतरण, स्वीकृत करणेस किंवा बोजा निर्माण करण्यास अगर तारण देण्यास या नोटीशीन्वये मनाई करण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| अ.क्र | कर्जदाराचे नाव व वसुली दाखला क्रमांक व दिनांक | मालमत्तेचे वर्णन |
|---|---|---|
| १. | कर्जदार :- सौ. सुषमा विष्णू तळेकर जामीनदार :-१) श्री. संतोष काळूराम पाबळे जामीनदार :- २) श्री. संभाजी विठ्ठल मेमाणे क्रमांक :-४५०/२०२५, दि:- १७/०९/२०२५ | मौजे सांगवी सांडस, ता. हवेली, जि. पुणे खाते क्र. १३५० गट क्र २०६ क्षेत्र ०.६८.०० आर आकार १.५५ रु. पैसे. (कर्जदार सौ. सुषमा विष्णू तळेकर यांच्या नावावरील जमीन मिळकत क्षेत्र) |
| २. | कर्जदार :- श्री.सचिन मोहन सावंत जामीनदार :- १) श्री. शशिकांत सिताराम भोर जामीनदार :-२) श्री. विजय हैबती होले क्रमांक :-२९५/२०२५, दि:- ३०/०७/२०२५ | मौजे चांडोली, ता.खेड, जि. पुणे खाते क्र. ३०९ १) गट क्र १६६ / १ क्षेत्र ०.५७.०० आर + पो.ख. ०.०२.५० आर आकार ०.९४ रु.पैसे. २) गट क्र. २१५ क्षेत्र ०.३२.७५ आर + पो.ख.०.०१.५० आर आकार १.७० रु. पैसे (कर्जदार श्री.सचिन मोहन सावंत यांच्या हिश्याची नावावरील जमीन मिळकत क्षेत्र ) |
| ३. | कर्जदार :- श्री. गोविंद शंकर भोर :-१) श्री. मयुरराज गोविंद भोर सहकर्जदार :-२) श्री. विनायक अशोक भागवत जामीनदार :- १) पृथ्वीराज गिसाजी गुजर जामीनदार :-२) पांडुरंग शंकर भोर क्रमांक :-१७०/२०२१, दि:- ११/०८/२०२१ | मौजे-रांजणी,ता.आंबेगाव, जि. पुणे खाते क्र. ११९३ १) गट क्र ११२० क्षेत्र १.०३.०० आर + पो.ख. ०.०२.०० आर आकार १.३३ रु. पैसे २) गट क्र.१०९३ क्षेत्र ०.४२.०० आर + पो.ख.०.०४.०० आर आकार ०.४७ रु. पैसे (कर्जदार श्री. मयुरराज गोविंद भोर यांच्या नावावरील जमीन मिळकत क्षेत्र) |

सदर ताबा नोटीस आज दिनांक-१०/०७/२०२६ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला.

**श्री आर. बी. वाघ**
विशेष वसुली व विक्री अधिकारी
(महाराष्ट्र सह.संस्था अधिनियम)
१९६० व नियम १९६१ कलम १५६१०७ व नियम (१)अन्वये

# अखेर प्रशासनाला जाग! आमरण उपोषणाचा शेवट

## लेखी आश्वासनानंतर तीन दिवसांच्या संघर्षाला यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** टाकळी कडेवळीत ग्रामस्थांच्या १३ प्रमुख मागण्यांसाठी सुरू असलेले आमरण उपोषण अखेर तिसऱ्या दिवशी प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. तीन दिवस सुरू असलेल्या या आंदोलनादरम्यान उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली होती. अखेर प्रशासनाने चर्चेसाठी पुढाकार घेत मागण्यांवर योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्यानंतर उपोषणाची सांगता झाली.




श्रीगोंदा तालुक्यातील टाकळी कडेवळीत गावातील पाणीपुरवठा, रस्ते, घरकुल, वीज, शाळेची इमारत, ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांचे लेखापरीक्षण यांसह १३ प्रमुख मागण्यांवर दीर्घकाळ कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने ग्रामस्थांनी आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला होता. उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी प्रशासन आणि आंदोलनकर्त्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाल्यानंतर तोडगा निघाला. गटविकास अधिकारी राणी फराटे, महावितरण चे अधिकारी भोगावत, सार्वजनिक बांधकाम चे अभियंता गुजर, जलजीवन चे भोसले यांच्या हाताने उपोषण मागे घेतले असले तरी प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते की नाही, याकडे आता संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे. ग्रामस्थांनीही आश्वासनांची पूर्तता न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

- तीन दिवसांचा संघर्ष; अखेर यश
- १३ मागण्यांसाठी आमरण उपोषण
- उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली
- प्रशासनाशी सकारात्मक चर्चा
- लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे
- आश्वासनांच्या अंमलबजावणीकडे ग्रामस्थांचे लक्ष लागून राहिले आहे.

# ...तर मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात बैठा सत्याग्रह

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** मागील काही महिन्यापासून ठेकेदार व पालिका प्रशासनाच्या मनमानी कारभारामुळे शहरवासीयांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अनेकदा मागणी करून देखील नागरिकांच्या कुठल्याही समस्यांची दखल घेतली जात नाही. आगामी पंधरा दिवसात परिस्थितीमध्ये सुधारणा न झाल्यास मुख्याधिकारी यांच्या दालनात बैठा सत्याग्रह करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते प्रशांत शेळके यांनी दिला आहे.

शेळके यांचा आंदोलनाचा इशारा पालिका सत्ताधाऱ्यांना घरचा आहेर ठरला आहे. शेळके यांनी जरी प्रभागातील समस्या मांडल्या असल्या तरी कमी जास्त प्रमाणात शहरातील सर्वच भागात नागरिकांना या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. ठेकेदार विकास कामे करत आहेत की नागरिकांना शिक्षा देत आहेत असा सुर नागरिकांना मधुन उमटत आहेत. कारण एका ही विकास कामांवर पालिका अधिकाऱ्यांचे लक्ष नाही फक्त कागद काळे करण्याचे काम संबंधित अधिकारी करतात. कोणताही अधिकारी प्रामाणिक काम करताना आढळत नाही. की कोणतेही काम योग्य पद्धतीने होत नाही. या अधिकाऱ्यांना आपले कामच काय आहे हे लक्षात येत नाही की यामागे काही गौडबंगाल आहे. यामुळे नेमक शहरात चाललय काय हे समजायला तयार नाही.



प्रभाग क्रमांक ६ सह शहर व परिसरातील विविध मागण्या संदर्भात श्री.शेळके यांनी मुख्याधिकारी संतोष लांडगे यांना निवेदन दिले.

# हिंदी विषयाची कार्यक्रम पुर्नरचना कार्यशाळा संपन्न




प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** येथील न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात तृतीय वर्ष हिंदी विषयाची अभ्यासक्रम पुनर्रचना कार्यशाळा संपन्न झाली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हिंदी अभ्यास मंडळ व महाविद्यालयाचा हिंदी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी विषयाचे अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांसाठी ही कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटनासाठी श्री. अमोल घोलप, सिनेट सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे हे उपस्थित होते. घोलप यांनी युवकांमधे चरित्र निर्माण व कौशल आधारित उपक्रम अभ्यास क्रमात असणे गरजेचे आहे असे सांगितले.प्रमुख पाहुणे म्हणून हिंदी अभ्यास मंडळाचे समन्वयक प्रा. डॉ सदानंद भोसले यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार तयार केलेल्या अभ्यासक्रमाचा आढावा घेत ज्ञान, कौशल्य व रोजगार निर्मिती हे सदर अभ्यासक्रमाचे मुख्य वैशिष्ट्ये होत. डॉ भोसले यांनी कृत्रिम बुद्धीमत्ता मुळे आपली कौशल्ये वाढीसाठी देखील अवाहन केले.याकार्यशाळेत विविध महाविद्यालयातील ५० पुणे, नासिक व अहिल्यानगर जिल्हयातुन प्राध्यापकांनी सक्रिय सहभाग घेतला. यावेळी डॉ बाळासाहेब सोनवणे, डॉ. नानासाहेब जावळे, डॉ अनंत केदारे, डॉ संजय दवंगे, डॉ वैशाली खेडकर, प्रा.संदीप पालवे हे उपस्थित होते. उद्घाटन व समारोप सत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. युवराज सुडके, आय क्यू ए सी समन्वयक डॉ. रवींद्र वैद्य हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. गोकुळ क्षिरसागर यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. आशा वडने व आभार डॉ. गहीनाथ शेळके यांनी मानले.

# द•ख•ल

## विठ्ठल विठ्ठल च्या गजरात श्री क्षेत्र हरेश्वर संस्थान दिंडी पंढरीकडे



**शिराळ चिचोंडी :** आषाढी एकादशीच्या पर्वा निमित्त हरेश्वर संस्थान ढमाळवाडी येथील संत श्रेष्ठ श्री मच्छिंद्र भाऊ महाराज मंदिरातून श्री शेत्र पंढरपूरकडे पायी दिंडी सोहळ्याचेमंगळवार दिनांक १४ भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. गेल्या ३६ वर्षापासून हरेश्वर संस्थान येथूनश्री क्षेत्र पंढरपूरची पायी दिंडी काढण्याची परंपरा अखंडपणे सुरू असून यंदाही हजारो वारकरी विठ्ठल नामाच्या गजरात पंढरीच्या दिशेने मार्गस्थ झाले विठ्ठल,विठ्ठल च्या अखंड नामघोषाने टाळ मृदंगाच्या निनादाने,भगव्या पताकाच्या डौलाने आणि भक्तिमय वातावरणाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला ह भ प भगवान महाराज मचे यांच्या मार्गदर्शनाखाली या दिंडीचे आयोजन करण्यात येते दिंडीचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. दरम्यान दिंडी हा केवळ भक्तीचा प्रवास नसून समाज प्रबोधनाचा संकल्प आहे धर्म कारणासोबत समाजकारणाचा संदेश देत व्यसनमुक्त समाज घडवण्याचे कार्य या दिंडीतून सातत्याने केले जात आहे अनेकांनी व्यसनाचा त्याग केल्याने दिंडीचा उद्देश सफल ठरत आहे असे भगवान महाराज मचेयांनी सांगितले.

## बाबुजी आव्हाड महाविद्यालयात करिअर संसदेची स्थापना



**पाथर्डी :** येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयात सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी करिअर कट्टा अंतर्गत करिअर संसदेची स्थापना करण्यात आली. जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने स्थापन करण्यात आलेल्या करिअर कट्टा अंतर्गत करिअर १० करियर संसद पदाधिकाऱ्यांची नियुक्ती यावेळी करण्यात आली. ओमकार शिरसाट या विद्यार्थ्याची पुन्हा मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली. दिपा काकडे नियोजन मंत्री, विद्या पुंड कायदे व शिस्तपालन मंत्री, संचिता वायकर सामान्य प्रशासन मंत्री, ऋतुंभरा उबाळे माहिती व प्रसारण मंत्री, मयुरी जाधव उद्योजकता विकास मंत्री, अनुष्का ढोले रोजगार व स्वयंरोजगार मंत्री, गौरव जाधव कौशल्य विकास मंत्री, ज्ञानेश्वरी पुंड संसदीय कामकाज मंत्री, अनम शेख महिला व बालकल्याण मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. सर्व नूतन करियर संसद पदाधिकारी यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बबन चौरे यांनी पद व चांगल्या कार्याची शपथ दिली. यावेळी प्रा. डॉ बबन चौरे म्हणाले, करिअर कट्टा अंतर्गत महाविद्यालयीन करिअर संसदेची स्थापना व त्याअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे हे दुसरे वर्ष असून जानेवारी महिन्यात झालेल्या करिअर संसदेच्या बारामती येथे झालेल्या राज्यस्तरीय अधिवेशनात महाविद्यालयाच्या करिअर संसद पदाधिकारी यांनी उल्लेखनीय कार्य केले. यावेळी डॉ किरण गुलदगड, डॉ अभिमन्यू ढोरमारे, डॉ वैशाली आहेर, पर्यवेक्षक प्रा. सलीम शेख, डॉ ब्रम्हानंद दराडे उपस्थित होते.

## चीनमध्ये पी.एच.डी. मिळवणाऱ्या मानुरकरचा हातगावात सत्कार



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील रहिवाशी व गरीब कुटुंबातील तरुण नागेश शिवनाथ मानुरकर या विद्यार्थाने चीनमध्ये जाऊन रसायन शास्त्र विभागातून पी एच डी पदवी प्राप्त केल्यामुळे या तरुणाचा हातगाव येथे ग्रामपंचायत कार्यालयात, रामेश्वर विद्यालयात तसेच जिल्हा परिषदेच्या शाळेत सत्कार करण्यात आला. यावेळी अरुण मातंग, प्रा भाऊसाहेब मुरकुटे, दत्ता भराट, दिलीप आंबेकर, गोरख कदम, शंकर भराट, बंडू घुले, बंडू घोंगाणे, श्रीकांत घुले, पापा शेख, अजमोद्दीन पठाण, अंकुश भिसे, शिवलिंग मानुरकर यांच्यासह इतरही ग्रामस्थ तसेच ग्रामपंचायत कर्मचारी दत्ता गायकवाड, ब्रम्हानंद मासाळ, पांडू डांगे, गणेश कांबळे, नारायण मातंग, मुराद पठाण, गणेश घोरतळे, अंकुश आयुब सय्यद, गोरक्ष सातपुते, बाळासाहेब कोकरे, सुनील म्हस्के, सतीश सुपारें, राहुल ज्योतिक, अशोक पवार, राजू मिसाळ, अक्षय मरकड, तेजस घुले, बापूसाहेब वाघमारे,धनंजय वैद्य, सुनीता पगारे, गणेश पुरुषोत्तम, बाळासाहेब वाघुंबरे, देविदास गर्कळ, हरिभाऊ सरदार, अंबादास कांबळे, संजीवन शेलार, वर्षा नागरे, दत्ता लेंडाळ उपस्थित होते.

## ज्ञानोबा तुकारामच्या गजरात शिराळ दुर्गामाता देवस्थान दिंडीचे पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ



**शिराळ चिचोंडी :** श्री शेत्र दुर्गामाता देवस्थान शिराळ येथून श्री शेत्र पंढरपूर कडे जाणाऱ्या पारंपारिक दिंडीचे उत्साह पूर्णभक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले ह.भपजगन्नाथ महाराज गवळी यांच्याप्रेरणेने सुरू झाली असून यावर्षी प्रथमच शिराळ ग्रामस्थांनी भव्य दिव्य रथासहआपला सहभागदाखविला ह भ प भाऊसाहेब महाराज मुळे वअरुण गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडीचे आयोजन करण्यात आले. प्रस्थान पूर्वी मृदुंग,विणा, टाळ,यांचे पूजन शिराळ गावातील ग्रामस्थांच्या हस्ते दुर्गादेवी मंदिर समोर करण्यात आले. त्यानंतर ज्ञानोबा तुकाराम च्या गजरातदिंडीने श्री शेत्र पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान केले. यावेळीह भ प भाऊसाहेब महाराज मुळे, ह भ प रावसाहेब महाराज मुळेह भ प तुकाराम महाराज झाडे, ह भ परामदास महाराज गोरे, ह भ प भाऊसाहेब महाराज काकडेह भ प शिवाजी महाराज घोरपडे,आदिनाथ मुळे,पाथर्डी बाजार समितीची संचालक वैभव खराटे चेअरमन आदिनाथ आव्हाड, शरद मुळेसरपंच रवींद्र मुळे किसन दारकुंडेबद्रीनाथ मुळेमहेश पाथरकर,प्राध्यापक सुरेश पाथरकर,जामवंत पालवे भैय्या तागड आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांमध्ये करिअर कौशल्य विकासावर भर : डॉ. टेमकर

**कासार पिंपळगाव :** करिअर संसद ही विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण, संघटन कौशल्य, निर्णयक्षमता आणि सामाजिक उत्तरदायित्व विकसित करणारे प्रभावी व्यासपीठ आहे. नव्या शैक्षणिक वर्षात करिअर संसदेच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, करिअर समुपदेशन, उद्योगतज्ज्ञांची व्याख्याने, कौशल्य विकास कार्यशाळा, विद्यार्थी संसद, सामाजिक उपक्रम तसेच रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. आदरणीय आमदार मोनिकाताई राजीव राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना महाराष्ट्र विधानमंडळाच्या कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर नेतृत्व, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासून आदर्श नागरिक म्हणून घडावे. असे मत डॉ. राजधर टेमकर यांनी व्यक्त केले. पाथर्डी तालुक्यातील आदिनाथनगर येथील दादापाटील राजळे महाविद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाची करिअर संसद स्थापन करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांचा विकास, करिअर नियोजन, लोकशाही मूल्यांची जोपासना आणि कौशल्यविकासाला चालना देण्यासाठी दादापाटील राजळे कला.

# हिरडगाव-चांडगाव शिवरस्ता अखेर खुला

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** गेल्या तब्बल ५० वर्षांपासून बंद असलेला श्रीगोंदा तालुक्यातील हिरडगाव-चांडगाव शिवरस्ता अखेर मोकळा करण्यात आला असून, त्यामुळे शेतकऱ्यांचा अनेक वर्षांचा प्रश्न मार्गी लागला आहे. शेतजमिनीपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ता नसल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.



हिरडगाव ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच विद्याताई बनकर यांनी हा प्रश्न तलाठी राम गोरे यांच्या निदर्शनास आणून दिला. त्यानंतर तलाठी राम गोरे यांनी आवश्यक पाठपुरावा करून हा शिवरस्ता अतिक्रमणमुक्त करत रहदारीसाठी खुला केला.

सुमारे १२ फूट रुंदीचा व ३.५ किलोमीटर लांबीचा हा शिवरस्ता आता वाहतुकीसाठी खुला झाला असून, १०० हून अधिक शेतकरी लाभार्थ्यांना याचा थेट फायदा होणार आहे. शेतीची मशागत, पीक वाहतूक आणि दैनंदिन शेतीकामे आता अधिक सुलभ होणार असल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी सरपंच विद्याताई बनकर, उपसरपंच अमोल दरेकर, संपत दरेकर, भरत भुजबळ, शोभा दरेकर तसेच हिरडगाव ग्रामस्थांनी तलाठी राम गोरे यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांचे विशेष आभार मानले.

# ३१ जुलैपर्यंत पीक विमा भरा कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** राज्यात सन २६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू करण्यात आली असून खरीप हंगामातील बाजरी, मूग, उडीद, तूर, सोयाबीन, कापूस व खरीप कांदा या सात पिकांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. पात्र शेतकऱ्यांनी ३१ जुलै २६ पूर्वी विमा योजनेत सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन शेवगाव तालुका कृषी अधिकारी अंकुश जोगदंड यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ३ जुलै २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सुधारित योजना लागू करण्यात आली आहे. अधिसूचित महसूल मंडळात अधिसूचित पिकाचे चालू वर्षातील सरासरी उत्पादन उंबरठा उत्पादनापेक्षा कमी झाल्यास संबंधित शेतकऱ्यांना विमा नुकसानभरपाई मिळणार आहे. कृषी विभागाने जाहीर केलेल्या माहितीनुसार अन्नधान्य व कडधान्य पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या २ टक्के, तर व्यापारी पीक असलेल्या कापूस व खरीप कांद्यासाठी ५ टक्के विमा हप्ता भरावा लागणार आहे. त्यानुसार कापसासाठी प्रतिहेक्टर ६५००० रुपये, खरीप कांद्यासाठी ७५ हजार रुपये, सोयाबीनसाठी ६२ हजार ५०० रुपये, तुरीसाठी ४७ हजार रुपये, बाजरीसाठी ३२ हजार रुपये, उडीदसाठी २६ हजार रुपये तर मुगासाठी २५ हजार ७५० रुपये विमा संरक्षित रक्कम निश्चित करण्यात आली आहे. या रकमेवर संबंधित पिकानुसार शेतकऱ्यांना विमा हप्ता भरावा लागणार आहे. योजनेत सहभागी होण्यासाठ ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक असणे बंधनकारक आहे. तसेच जमिनीची कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक आणि आधारशी संलग्न बँक खाते आवश्यक राहणार आहे. शेतकऱ्यांनी राष्ट्रीय पीक विमा पोर्टल (एनसीआयपी) वर ऑनलाइन अर्ज करावा किंवा बँक, कॉमन सर्व्हिस सेंटर (सीएससी) अथवा स्वतःच्या माध्यमातून अर्ज सादर करता येणार आहे.



## करंजीतुन उत्तरेश्वर दिंडीचे प्रस्थान

**करंजी :** करंजी ता. पाथर्डी येथून गेल्या तीन वर्षापासून ग्रामदैवत उत्तरेश्वर व रामगड या देवस्थानच्या वतीने दिंडीचे नियोजन केले जाते. बुधवारी दुपारी दोन वाजता या दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले.

कु.वैष्णव दिदि मुखेकर यांच्या मार्गदर्शकाखाली व श्री हभप महादेव महाराज अकोलकर हभप नामदेव महाराज मुखेकर यांच्या अधिपत्याखाली ही दिंडी निघते.यावर्षी या दिंडीचे वैशिष्ट म्हणजे या दिंडीसाठी ग्रामस्थांनी बनवलेला खास असा ' शिवरथ ' होय. या रथामध्ये महादेवाचे पिंड ठेवण्यात आलेली आहे.


पंचक्रोशीतून लोहसरची भैरवनाथ दिंडी , वृद्धेश्वर येथील उंब्रेकर महाराज दिंडी तर वैजूबाभुळगाव होऊन संत तनपुरे बाबा या दिंड्यांचे प्रस्थान या दोन दिवसात होत आहे. करंजी येथील दिंडीत मोठ्या प्रमाणात भाविक सहभागी होत असुन आज प्रस्थान वेळी बाळासाहेब अकलकर ,सुनील साखरे, विजय अकोलकर, गुरुजी नवनाथ आरोळे, राहुल अकोलकर या सह माता भगिनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या.

# महसूल, पोलिसांची डोळेझाक ; शासकीय जमिनीची लूट?

## फक्त कागदी घोडे नाचवून एमआयडीसी प्रशासन मोकळे

सर्जेराव साळवे । राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथील २५२ हेक्टर जमिनीचा ताबा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला देऊन २ वर्षे पूर्ण झाले. या क्षेत्राचा प्रारूप आराखडा देखील मंजूर करण्यात आला परंतु ताब्यात असलेल्या शासकीय जमिनीतून रात्रीच्या वेळी राजरोसपणे आणि बेकायदेशीरपणे मोठ्या प्रमाणात मातीचा उपसा सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार अजूनही सुरूच आहे. जेसीबी मशीनच्या साहाय्याने या जागेची अक्षरशः चाळण केली जात आहे. मात्र, स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि स्वतः एमआयडीसी प्रशासन याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



> एकीकडे एमआयडीसी केवळ पत्रव्यवहाराचे नाटक करत आहे, तर दुसरीकडे महसूल व पोलीस यंत्रणा माफियांच्या दावणीला बांधली गेली आहे. शासकीय मालमत्तेची ही उघडी दरोडेखोरी तात्काळ थांबवून एमआयडीसीच्या बेजबाबदार अधिकाऱ्यांवर आणि माती माफियांवर गुन्हे दाखल झाले नाहीत, तर नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. **नारायण हिरवे**

या संपूर्ण प्रकरणात एमआयडीसी प्रशासनाची भूमिका अत्यंत संशयास्पद आणि बेजबाबदारपणाची राहिली आहे. आपल्या ताब्यातील कोट्यवधी रुपयांच्या जमिनीची राजरोस चोरी होत असताना, एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी केवळ तहसीलदार आणि श्रीगोंदा पोलीस ठाण्याला लेखी पत्र व स्मरणपत्रे पाठवून आपली जबाबदारी झटकली आहे. स्वतःच्या मालकीच्या जागेचे रक्षण करण्यासाठी एमआयडीसीने घटनास्थळी साधे सुरक्षारक्षक का तैनात केले नाहीत? किंवा पोलीस अधीक्षकांकडे थेट दाद का मागितली नाही? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. एमआयडीसी प्रशासनाच्या या ढिसाळ आणि उदासीन कारभारामुळेच माती माफियांचे मनोबल वाढले असून, एमआयडीसी अधिकाऱ्यांचेही या माफियांसोबत संगनमत आहे का? अशी शंका आता व्यक्त केली जात आहे.

> दरम्यानच्या काळात होत असलेल्या माती उपशाबाबत आम्ही जिल्हाधिकारी आणि महसूल विभागाला यापूर्वीच लेखी पत्र देऊन कळवले आहे. स्थानिक प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे . एमआयडीसीच्या मालमत्तेचे आणि जमिनीचे संरक्षण करण्यासाठी आम्हाला शस्त्रधारी सुरक्षा यंत्रणेची गस्त असणे आवश्यक आहे, आणि तसा कायमस्वरूपी सुरक्षा यंत्रणेचा प्रस्ताव आम्ही मुख्य कार्यालयाकडे दोन दिवसांत पाठवत आहोत.
>
> **– गणेश राठोड, अधिकारी, एमआयडीसी अहिल्यानगर**

मोठ्या प्रमाणात माती उपसा होऊन देखील तहसीलदार यांनी माती उपसा बंद असल्याचे सांगितले जात आहे . कायद्यानुसार शासकीय जमिनीचे रक्षण करण्याची आणि अवैध उत्खनन रोखण्याची मुख्य जबाबदारी ही महसूल विभागाची म्हणजेच तहसीलदारांची आहे. एमआयडीसीने लेखी तक्रार देऊनही महसूल विभागाने अद्याप कोणतीही धडक कारवाई केलेली नाही. रात्रीच्या अंधारात राजरोसपणे कोट्यवधी रुपयांची माती उपसली जात असताना तहसीलदार ढिम्म का? त्यामुळे तहसीलदार यांचेच या माती माफियांना छुपे पाठबळ आहे का? असा थेट सवाल आता स्थानिक नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

> एमआयडीसीच्या जागेत अवैध माती उपसा सुरू असल्याचे वृत्त पूर्णपणे चुकीचे आहे. आमचे पथक या संपूर्ण भागावर पूर्णवेळ लक्ष ठेवून असून, सध्या तिथे असा कोणताही बेकायदेशीर माती उपसा किंवा वाहतूक सुरू नाही. पूर्वी कधीतरी उत्खनन झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही,
>
> **–सचिन डोंगरे (तहसीलदार श्रीगोंदा )**

स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रात्रीचा अंधार पडताच या परिसरात अवजड वाहनांची आणि जेसीबी यंत्रांची मोठी वर्दळ सुरू होते. शेकडो ब्रास माती बेकायदेशीरपणे उपसून ती चढ्या दराने विकली जात आहे. यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असून पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होत आहे.

# दैनिक राष्ट्र सह्याद्री


## आ. विवेक कोल्हे यांच्या उपस्थितीत श्रीरामपुरातील कायदा-सुव्यवस्थेवर चर्चा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** - आमदार विवेक कोल्हे यांनी श्रीरामपूर येथे माजी नगरसेवक किरण लुनिया यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी श्रीरामपूरमधील कायदा व सुव्यवस्थेबाबत महत्त्वपूर्ण चर्चा झाली. या बैठकीला प्रकाश चित्ते, सुनील मुथा, किरण लुनिया, अभिजित कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. शहरातील विविध स्थानिक प्रश्नांवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.



# पंतप्रधान मोदींची आंतरराष्ट्रीय पत कमी : हर्षवर्धन सपकाळ



वैजापूर येथे बुधवारी आयोजित शेतकरी मेळाव्यात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मार्गदर्शन केले.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आंतरराष्ट्रीय पत कमी झाली आहे. त्यामुळेच जगभरतील देश भारतातील शेतीमाल घेण्यास नकार देत आहेत. यात प्रामुख्याने बांगलादेश, श्रीलंका हे देश कांदा खरेदी करत नसल्याने कांद्याचे देशांतर्गत भाव कोसळत असून त्याचा फटका येथील शेतकऱ्यांना बसत आहे. निर्यात घटल्याने कांद्यासह सोयाबीन, मका, आंबा अ अन्य फळांची निर्यात थांबून भाव कमी होत आहेत. मात्र तरीही या सरकारला त्याचे भान नसून हे सरकार केवळ अडाणी व अंबानी या उद्योगपतींसाठीच काम करत आहे. त्यामुळे केंद्रातील मोदी व राज्यातील फडणवीस सरकारला खाली खेचल्याशिवाय शांत बसणार नाही असा इशारा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी वैजापूर येथे बुधवारी दिला. प्रदेश काँग्रेस समितीच्या वैजापूर तालुका व शहर शाखेतर्फे येथील स्टेशन रस्त्यावरील लॉन्समध्ये आयोजित शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी खासदार डॉ कल्याण काळे, माजी आमदार अनिल पटेल, नामदेव पवार, जिल्हाध्यक्ष किरण डोणगावकर, हनुमंत पवार, ॲड. प्रमोद जगताप, ॲड. आर. डी. थोट, ऋषिकेश पाटील, सागर साळुंके, संदीप पाटील, रोहित आहेर या मान्यवरांची उपस्थिती होती. काँग्रेसचे तालुका अध्यक्ष राहुल संत, शहर अध्यक्ष डॉ. नितेश शहा, साहेबराव पडवळ, प्रवीण खाजेकर, सुभाष गायकवाड यांच्यासह तालुका काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी राहुल संत यांनी प्रास्ताविक करताना तालुक्यातील शेतकऱ्यांच्या समस्या व त्याबाबात गेल्या काही महिन्यात तालुका काँग्रेस तर्फे घेण्यात आलेली आंदोलनाची भुमीका याबाबत माहिती दिली. यावेळी खासदार डॉ कल्याण काळे, हनुमंत पवार चंद्रकांत कटारे आदींनी आपल्या भाषणातून केंद्र व राज्य सरकारवर सडकून टिका केली. राज्य सरकारने कर्ज माफी केली असली तरी अद्याप हजारो शेतकरी कर्जमाफीपासून वंचित आहेत. त्यांची कर्जमाफी कधी होणार असा सवाल करत येत्या २० जुलैपासून सुरु होत असलेल्या संसदेच्या अधिवेशनात शेतकरी, शेतमजूर व महिलांचे प्रश्न मांडू, आंदोलन करू असा इशारा डॉ काळे यांनी दिला. शेतकऱ्यांचे हित व त्यांचे भविष्य या अनुषंगाने देशात व राज्यात वाईट परिस्थिती असून याबाबत सरकारला जाब विचारला पाहिजे. पंतप्रधान बेरोजगारी, शेतीमालचा भाव, महिलांवरील अत्याचार, महागाई याविषयी बोलायला तयार नाहीत. मोदी सरकारला दाबण्याचे काम अमेरिका करत आहे. अमेरिका सोबत केलेल्या करारमुळे तेथील माल भारतात विकण्याचा मार्ग मोकळा झाला आहे असे प्रदेशाध्यक्ष सपकाळ म्हणाले. शेतकरी मेळाव्याला तालुक्यातील शेतकरी, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेकायदेशीर अग्नि शस्त्रांचा साठा जप्त



## एकावर गुन्हा दाखल, संशयित फरार !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरात अवैध अग्निशस्त्रांचा वापर करून गंभीर गुन्हे घडण्याची शक्यता लक्षात घेता, श्रीरामपूर शहर पोलिसांनी धडक मोठी मोहीम हाती घेतली आहे. पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या विशेष शोधमोहिमे दरम्यान मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर शस्त्रसाठा जप्त करण्यात आला असून, एका संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील संशयित गुन्हेगारांच्या हालचालींवर नियंत्रण मिळवण्यासाठी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याकडून प्राप्त झडती वॉरंटच्या आधारे संशयितांची घरे आणि वाहनांची तपासणी सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत राजेंद्र कॉम्प्लेक्स, वॉर्ड नं. ७, प्लॉट क्र. ११३, श्रीरामपूर येथील संशयित ओंकार उर्फ भोला शंकर साळवे हा फरार असून यांचा पोलीस शोध घेत आहेत. घरात पोलिसांनी पंचासमवेत छापा टाकला असता एक स्टीलचे मॅगझीन व त्यातील ३ जिवंत काडतुसे, एक 'एल सी आर' ६९८ 'ए' कंपनीचा धारदार चॉपर, एक धारदार चॉपर, एक स्टीलच्या मुठीचा धारदार चॉपर असा एकूण पाच हजारांचा किमतींचा हा सर्व मुद्देमाल पोलिसांनी घटनास्थळावरून हस्तगत केला. या झडतीवेळी उपस्थित असलेले संशयिताचे वडील शंकर भावराव साळवे यांनी सदर शस्त्रे त्यांचा मुलगा ओंकार साळवे याच्या मालकीची असल्याचे पोलिसांना सांगितले. सदर शस्त्रे बाळगण्याबाबत संशयिताकडे कोणताही वैध परवाना आढळून आला नाही. ही घातक शस्त्रे बेकायदेशीर विक्रीच्या उद्देशाने किंवा गंभीर गुन्हा करण्याच्या हेतूने बाळगल्याची खात्री पटल्याने, आरोपी ओंकार उर्फ भोला शंकर साळवे यांच्याविरुद्ध श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६९५/२०२६, भारतीय हत्यार कायदा, १९५९ चे कलम ३, ४/२५ आणि ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या आरोपी फरार असून पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत. सदर यशस्वी कारवाई अहमदनगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विशाल चंद्रकांत खैरे व त्यांच्या पथकातील अंमलदारांनी केली. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सी. के. लोखंडे करत आहेत.

## उंबरी बाळापूर दरोडा प्रकरणी दोन सराईत गुन्हेगार जेरबंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी ।** संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर येथे एप्रिल महिन्यात झालेल्या सशस्त्र दरोडा प्रकरणाचा उलगडा करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले असून, दोन सराईत गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील अनेक घरफोडी, चोरी व दरोड्याच्या गुन्ह्यांचा छडा लागण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. १८ एप्रिल २०२६ रोजी रात्री उंबरी बाळापूर येथे सशस्त्र दरोडेखोरांनी एका घरात घुसून १० ते ११ तोळे सोन्याचे दागिने, ६० हजार रुपयांची रोख रक्कम असा सुमारे ५ लाख ६५ हजार रुपयांचा ऐवज लुटला होता. दरोड्यादरम्यान एका वृद्ध महिलेच्या कानातील दागिने बळजबरीने हिसकावून घेतल्याने त्या गंभीर जखमी झाल्या होत्या. याप्रकरणी आश्वी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास सुरू असताना स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार वाळकी शिवारात सापळा रचून अजय सादीश काळे (वय २४, रा. वाळुंज, जि. अहिल्यानगर) व अक्षय उर्फ सोन्या अर्पण भोसले (वय २६, रा. घानेगाव, ता. पारनेर) यांना ताब्यात घेण्यात आले. कसून चौकशीत दोन्ही आरोपींनी ८ ते ९ साथीदारांसह अनेक गुन्हे केल्याची कबुली दिली असून, आश्वी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या उंबरी बाळापूर दरोडा प्रकरणातही सहभाग असल्याचे मान्य केल्याची माहिती पोलिसांनी दिली. दोन्ही आरोपींविरुद्ध जिल्ह्यासह बाहेरील जिल्ह्यांमध्ये दरोडा, जबरी चोरी आणि घरफोडीचे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. या कारवाईमुळे पंचक्रोशीतील इतर चोरी व दरोड्यांच्या घटनांचाही उलगडा होण्याची शक्यता असून, या टोळीतील फरार साथीदारांचा शोध पोलीस घेत आहेत.

## ६०४ ग्रॅम गांजासह १७ हजारांचा मुद्देमाल जप्त, एक गजाआड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरात अवैध अमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर श्रीरामपूर शहर पोलिसांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने संयुक्त मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत ६०४.८४ ग्रॅम गांजा आणि रोख रकमेसह एकूण १७,६२१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. तर या गुन्ह्यातील मुख्य पुरवठादार सध्या फरार असून पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार (दि.१४) जुलै रोजी सायंकाळी ४:१९ वाजेच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे यांना गुप्त बातमीदाराकडून अत्यंत खात्रीशीर माहिती मिळाली. इरफान छोटू शेख (वय ४०, रा. कुरेशी मोहल्ला, वार्ड नं.२) याने आपल्या राहत्या घरात विक्रीच्या उद्देशाने अमली पदार्थ (गांजा) आणून ठेवला असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे, स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार आणि श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनच्या पथकाने संयुक्त सापळा रचला. श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांना याबाबत अवगत करून, सहाय्यक पोलीस निरीक्षक शिखरे यांनी दोन पंचांसमक्ष संशयित आरोपीच्या घरावर छापा



टाकला. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून घराची झडती घेतली असता, पोलिसांना घरातून बेकायदेशीर व विनापरवाना बाळगलेला ६०४.८४ ग्रॅम गांजा आढळून आला. पोलिसांनी घटनास्थळावरून मुख्य आरोपीला तात्काळ ताब्यात घेतले. त्याची अधिक चौकशी केली असता, हा गांजा त्याने फरार आरोपी फकीर यांच्याकडून विक्रीसाठी आणल्याचे कबुली इरफान छोटू शेख याने दिली. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६९४/२०२६ नुसार, गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ कायदा कलम ८(क), २०(ब), (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची धडक कारवाई अहमदनगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, श्रीरामपूर अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर, आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. या यशस्वी कारवाईत श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विशाल चंद्रकांत खैरे, स.पो.नि राम शिखरे, पो.उ.नि.अनंत सालगुडे व इतर पोलीस अंमलदारांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. पोलीस उपनिरीक्षक हर्षवर्धन बहिर हे या गुन्ह्याचा अधिक तपास करत असून, फरार आरोपी 'फकीर' यांच्या शोधासाठी पथके रवाना

## कोळपेवाडी पोलीस चौकी असून अडचण नसुन खोळंबा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : तालुक्यातील पश्चिम भागातील वाढत्या चोरीच्या घटनांना आळा बसावा व गुन्हेगारांना वचक बसण्यासाठी कोपरगाव पोलीस स्टेशन अंतर्गत कोळपेवाडी पोलीस दुरक्षेत्राची निर्मिती झाली आहे पोलिस चौकीला पोलीस नसल्याने अक्षरशः पोलिस चौकी परंतु गेली कित्येक दिवसापासून धुळखात पडली असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे

कोपरगाव तालुक्याच्या पश्चिम भागातील कोळपेवाडी व सुरेगाव मोठी बाजारपेठ असल्याने याठिकाणी उद्योग, व्यवसाय, छोटे मोठे दुकानदार असून यांना संरक्षण म्हटलं कि पोलिस दादा असतात परंतु या चौकिमध्ये पोलीस कधी असतात तर कधी नसल्याने अवैध देशी, विदेशी दारूचे अड्डे मोठ्या प्रमाणावर वाढले असून पोलीस इमारत अक्षरशा धुळखात उभी असल्याने व्यापारी व नागरिकांमध्ये संतप्त भावना निर्माण झाल्या आहेत या पोलिस चौकीकरिता पोलीस उपनिरीक्षक,सहाय्यक फौजदार, पोलिस हेड कॉन्सटेबल, पोलिस कॉन्सटेबल, पोलिस शिपाई असे चार पदाची निर्मिती आहे परंतु नुकत्याच झालेल्या पोलीस कर्मचारी बदलल्यामुळे तसेच काही पोलीस कर्मचारी आजारी असल्याने रजेवर आहेत त्यामुळे पोलीस चौकी कडे पोलीस दादाच नसल्याने नागरीकांचा संरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे त्यामुळे सध्या परिसरामध्ये मोटर सायकल चोर , मोबाईल चोर , विद्युत मोटार,केबल चोर वर डोके काढत आहे या पोलिस चोरी, दुकाने फोडी अशा घटना स्टेशनच्या अंतर्गत सुरेगाव, कोळगावथडी, वेळापूर, माहेगाव देशमुख. कंभारी मळेगाव थडी, दंडे-चांदवड, मढी बु., शहाजापूर, कारवाडी, हांडेवाडी मंजूर, कोळगावपाटी, मोर्विस, वडगाव, बक्तरपुर, इत्यादी गावांचा समावेश असून या गावामध्ये रात्री-अपरात्री काही अनुचित प्रकार घडल्यास घटनास्थळी पोहोचण्यासाठी कोपरगाव ते कोळपेवाडी पोलिसांना किमान अर्धा तासाचा वेळ लागतो या कालावधीमध्ये गुन्हेगार सहजपणे पसार होऊ शकतात त्यात पश्चिम भागातील बहुतेक लोकवस्ती हि शेतातल्यावाडी, वस्तीवर विखुरलेली आहे त्यामुळे एखादी घटना घडल्यास पोलिसांना घटनास्थळापर्यत पोहोचणे हे अशक्य होते सुरेगाव व परिसरातील गावामध्ये अवैध देशी दारूचे अड़े मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत पोलिसांच्या बोटचेप्या भूमिकेमुळे यावर धंद्यात सध्या लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येत आहे अवैध धंदे सध्या खुलेआम सुरू आहेत याकडे लक्ष नसल्याने देशी-विदेशी व दारू लपून-छपून विकी होती होत आहे . त्यात विविध सण परतु सध्या खुलेआम विक्री राजकीय सभा, राजकीय नेत्यांचे दौरे यासाठी कोळपेवाडी पोलीस सेशनचे बरेचसे मनुष्यबळ खर्ची होते आधीच कोळपेवाडी पोलीस स्टेशनला उपलब्ध असणारा कर्मचारीवर्ग संख्येने अपुरा आहे याच्यावरही अतिरिक्त कामाचा प्रचंड बोजा पडत असल्याने तालुक्यात कायदा व सुव्यवस्था राखताना त्यांची दमछाक होते यामुळे कोळपेवाडी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावांचा वाढता पसारा पाहता याठिकाणी जास्तीचे पोलिस कर्मचारीउपलब्ध करणे गरजेचे आहे.

## शासकीय कर्तव्यात अडथळा ; महिला वनरक्षकाला कुऱ्हाड दाखवून धमकी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : समृद्धी महामार्ग परिसरात शासकीय कर्तव्य बजावत असलेल्या सामाजिक वनीकरण विभागाच्या एका महिला वनरक्षकास कुऱ्हाड दाखवून जीवे मारण्याची धमकी देत शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी वैजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाभूळगाव पोस्ट वाकला येथील रहिवासी तथा सामाजिक वनीकरण विभागात कार्यरत जयश्री बाबूलाल भगत यांच्याकडे समृद्धी महामार्गावरील चॅनेज क्रमांक ४६५ ते ४७८ या परिसराची पाहणी करणे व अवैध पशुचराई रोखण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्या हडसपिंपळगाव परिसरातील चॅनेज क्रमांक ४७१.६०० येथे कर्तव्य बजावत असताना ओमराज रंधे हा प्रतिबंधित क्षेत्रात बकऱ्या चारत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी त्याला तेथे बकऱ्या न चारण्याची सूचना केली. मात्र, समजावून सांगूनही त्याने सूचना न मानता हातातील कुऱ्हाड दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण करून महिला वनरक्षकास कर्तव्य बजावण्यापासून रोखल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. घटनेनंतर जयश्री भगत यांनी वैजापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करून संबंधित आरोपीविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली. पोलिसांनी तक्रारीच्या आधारे गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.



## भुंगा लागलेला पोषण आहार विद्यार्थ्यांना वाटप

### तो आहार बकऱ्यांना द्या ; प्राचार्यांचे अजब उत्तर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : तालुक्यातील पोहेगाव येथील श्री ग.र. औताडे पाटील विद्यालय म्हणजे परिसरातील विद्यार्थ्यांचे गुरुकुल. याच विद्यालयात शालेय पोषण आहार विभागाकडून विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळण्याचा प्रकार घडला आहे. चक्क भुंगा लागलेला वटाणा विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी पोषण आहार घरी आणल्यानंतर पालकांच्या ही गोष्ट लक्षात आली.त्यांनी या प्रकाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख नितीन औताडे यांना पालकांनी या संदर्भात माहिती दिली असता. पोषण आहारामध्ये खरोखर भुंगा लागलेला आहे का याची सत्य परिस्थिती त्यांनी जाणून घेतली. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळणारा हा प्रकार अतिशय घाणेरडा असल्याचे त्यांनी सांगितले. या संदर्भात त्यांनी विद्यालयाचे प्राचार्य विजय भोसले यांच्याशी संपर्क केला असता हा पोषण आहार मुलांना वाटप केला. मात्र बकऱ्यांना किंवा जनावरांसाठी याचा उपयोग करा असा अजब उत्तर त्यांनी दिले. ही बाब योग्य नसल्याचे औताडे यांनी लक्षात आणून दिल्यानंतर मात्र प्राचार्यांनी थेट शासकीय यंत्रणेकडेच बोट दाखवत शिल्लक राहिलेला आहार कटवुन टाकला नाही तर पुढचा आहार मिळत नसल्याचे सांगितले. विद्यालयात पुढच्या महिन्यासाठी येणाऱ्या आहारासाठी मागच्या महिन्याचा कोठा रीकामा दाखवावा लागतो. यासाठी भुंगे लागणारा आहार विद्यार्थ्यांना वाटून त्यांच्या आरोग्याशी खेळण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला असा प्रश्न निर्माण होतो. खराब पोषण आहार वाटपामुळे पालकांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून यासंदर्भात रयत शिक्षण संस्था, गटशिक्षणाधिकारी कोपरगाव पंचायत समिती व प्रशासकीय यंत्रणेशी संपर्क साधून या अजब प्रकाराविषयी तक्रार करणार असल्याचे नितिनराव औताडे यांनी सांगितले.

## खिडकी तोडून घरफोडी

### सोन्याचे दागिने, रोख रक्कम चोरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील कोपरे-बोरी फाटा येथे अज्ञात चोरट्यांनी घराच्या खिडकीतून प्रवेश करून सोन्याचे दागिने, रोख रक्कम आणि साड्यांसह लाखोंचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

भाऊसाहेब भानुदास जगताप (वय ६८) हे कुटुंबासह कोपरे-बोरी फाटा येथे राहतात. १३ जुलै रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास कुटुंबीय जेवण करून घरातील वेगवेगळ्या खोल्यांमध्ये झोपले होते. याचवेळी अज्ञात चोरट्यांनी घराच्या खिडकीतून आत प्रवेश केला. घरातील सामानाची उचकापाचक करत त्यांनी एक तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, २० हजार रुपयांची रोख रक्कम तसेच ४० साड्या असा ऐवज चोरून नेला.

१४ जुलै रोजी सकाळी भाऊसाहेब जगताप यांना घरात चोरी झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी तातडीने राहुरी पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

भाऊसाहेब जगताप यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५(अ) व ३३१(४) अन्वये चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलीस तपास सुरू आहे. घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## १२ टक्के व्याजाचे आमिष; राहुरीतील पतसंस्थेच्या चेअरमन व संचालकांवर फसवणुकीचा गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी ।** ठेवींवर १२ टक्के व्याजदराचे आमिष दाखवून लाखो रुपयांच्या ठेवी स्वीकारल्यानंतर मुदतपूर्ती होऊनही रक्कम परत न केल्याप्रकरणी राहुरी तालुक्यातील एका पतसंस्थेच्या चेअरमन व संचालकांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुंजाराम शेगजी पाटील (वय ६८, रा. पुरुषोत्तम नगर, राहुरी), सेवानिवृत्त मुळा पाटबंधारे उपविभाग कर्मचारी यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, राहुरी येथील शितल कॉम्प्लेक्स, येवले इस्टेट येथे कार्यरत असलेल्या विश्वमनी ग्रामीण मल्टीपर्पज निधी लिमिटेड या पतसंस्थेत त्यांनी व त्यांच्या पत्नी नम्रता पाटील यांच्या नावाने वेळोवेळी एकूण १३ लाख ४ हजार रुपयांच्या मुदतठेवी केल्या होत्या.

ठेवींची मुदत पूर्ण झाल्यानंतर त्यांनी पतसंस्थेकडे रक्कम परत मिळण्याची मागणी केली. मात्र, ''आज देतो, उद्या देतो'' अशी आश्वासने देत संबंधितांनी पैसे परत दिले नाहीत. त्यामुळे आर्थिक अपहार करून फसवणूक केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या पतसंस्थेत गुंतवणूक केलेल्या इतर ठेवीदारांनाही मुदतपूर्तीची रक्कम मिळालेली नसल्याचा दावाही फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी चेअरमन गणेशराव रमेश गोपाळे, संचालक शंतनु रमेश गोपाळे तसेच मेघा भगवान सोनवणे ऊर्फ मेघा गणेश गोपाळे (सर्व रा. बारागाव नांदूर, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेतील कलम १२०(ब), ३४, ४०६, ४०९, ४२० व ३ अन्वये राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघमारे करीत आहेत.

## आळेफाटा मुले बेपत्ता, 'किडनॅपिंग'च्या अफवा खोट्या, वास्तव मात्र धक्कादायक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा** : येथून दोन अल्पवयीन मुले एकाच दिवशी बेपत्ता झाल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली होती. सोशल मीडियावर या मुलांना कोणीतरी 'किडनॅप' केल्याचे मेसेज वेगाने व्हायरल होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. मात्र, आळेफाटा पोलिसांनी या प्रकरणाचा कसून तपास केला असता, सोशल मीडियावरील दावे पूर्णपणे खोटे असल्याचे समोर आले असून एक अत्यंत धक्कादायक आणि डोळे उघडणारे वास्तव उघडकीस आले आहे.

पोलीस तपासातील प्राथमिक माहितीनुसार, ही दोन्ही मुले गेल्या अनेक दिवसांपासून शाळेत जातच नव्हती. ती दररोज सकाळी घरातून शाळेच्या नावाने गणवेश घालून बाहेर पडायची. मात्र, शाळेत न जाता आळेफाटा येथील मार्केट यार्डच्या मागे असलेल्या एका बंद पडलेल्या इमारतीमध्ये जाऊन दिवसभर खेळत बसायची. शाळा सुटण्याच्या वेळेस ती पुन्हा घरातल्यांना थाप मारून नियमितपणे घरी परतत असत. त्यामुळे आपली मुले रोज शाळेत जातात, याच भ्रमात पालक होते. मुले अनेक दिवस गैरहजर असल्याने अखेर शाळा प्रशासनाने पालकांना फोन करून माहिती दिली. आपली चोरी पकडली गेल्याचे आणि आता घरी गेल्यावर आई-वडिलांच्या सडकून माराला सामोरे जावे लागेल, याच भीतीने दोन्ही मुलांनी घर सोडून पळ काढला. पोलिसांच्या प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे की, अपहरणाचा कोणताही प्रकार घडलेला नसून मुले केवळ भीतीने गेली आहेत. पोलीस या प्रकरणी चोख चौकशी करत असून लवकरच मुलांचा शोध घेतला जाईल. या घटनेमुळे पालकांसाठी एक मोठा इशारा मिळाला असून, आपली मुले खरोखरच शाळेत जातात का, यावर पालकांनी बारीक लक्ष ठेवणे अत्यंत गरजेचे झाले आहे.